cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र वर्ष - ५ अंक-५७ शुक्रवार दि.७ जून २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने- ६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

### काँग्रेसचा हात जनतेच्या हातात!

भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) २९४ जागा जिंकून केंद्रात सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापनेच्या दिशेने कूच केली आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीनेही २३२ जागा जिंकून एनडीएला जोरदार टक्कर देत त्यांच्या नाकीनऊ आणले. अन्य पक्षांना १७ जागा मिळाल्या. गत निवडणुकीत भाजपने स्वबळावर ३०३ जागा जिंकून बहुमत मिळवले होते. मात्र यावेळी भाजपला केवळ २३९ जागा मिळाल्याने त्यांना मित्रपक्षांच्या मदतीने सरकार स्थापन करावे लागणार आहे. गत लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या जागांपैकी सुमारे ६४ जागा भाजपने यावेळी गमावल्या आहेत.

### खूषखबर! मान्सून महाराष्ट्रात आला

पुणे । प्रतिनिधी

चार दिवसांपासून गोव्यात अडकलेला मान्सून गुरुवारी ६ जून रोजी दुपारी ३ वाजता तळकोकण ओलांडून पुढे आला. दुपारी ४ पर्यंत रत्नागिरी, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर शहरे काबिज केली होती. आगामी काही तासांत तो पुणे, मुंबई शहरात दाखल होईल, असा अंदाज आहे. यंदा तो राज्यात नियोजित वेळेपेक्षा एक दिवस उशीरा दाखल झाला आहे. हवेचे दाब अनुकूल होताच मान्सून गुरुवारी ६ जून रोजी राज्यात दाखल झाला. रत्नागिरी, सोलापूर, कोल्हापूर, सातारा, सांगली शहरात आला.

# डीएपी, युरीया किटकनाशकाची तीप्पट दराने खरेदी

## कृषी आयुक्तालयाचा मोठा घोटाळा, विजय वडेट्टीवार यांचा आरोप

मुंबइ । प्रतिनिधी

नॅनो डीएपी व नॅनो युरीया, मेटाल्डीहाईड किटकनाशकाची तीप्पट दराने खरेदी सुरू आहे. या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या भ्रष्टाचाराला कोणाचा आशिर्वाद आहे, असा संतप्त सवाल करत या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीची मागणी करा. याबाबत विधानसभेत आवाज उठविणार असल्याचा इशारा विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी दिला.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्या. नॅनो डीएपी व नॅनो युरीया खते तयार करत नाही. त्यामुळे ही खते इफको कंपनीकडून कृषी आयुक्तालय थेट खरेदी करुन शेतकऱ्यांना त्याचे वाटप करते. कृषी आयुक्तालयाने हा निधी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्या. यांना वितरीत केला आहे. यामध्ये मोठा भ्रष्टाचार झाला असल्याची माहिती समोर आली आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मेटाल्डीहाईड या किटकनाशकाची निर्मिती करत नाही. त्यामुळे या निविदांसाठी प्रणाली राबविण्याचे शासनाचे सक्त आदेश आहेत. तरीही महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाला निधी वितरीत करून महामंडळाच्या मध्यस्थीमार्फत किटकनाशक विकत घेऊन मोठ्या ◀◀ पान २ वर



### जास्तीचे सेवा शुल्क आकारले

खरेदीसाठी महामंडळाला शासनाकडून ॲडव्हान्स प्राप्त झाले असता ३% सेवा शुल्क आकारण्यात येत होते, परंतु या बाबतीत महामंडळ १३% ते १३.२५% टक्के सेवा शुल्क आकारत आहे. ही बाब अत्यंत चुकीची आहे. या प्रक्रिया बेकायदेशीर असल्याने तात्काळ रद्द कराव्यात. या प्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली आहे.

# शेअर बाजारात ३० लाख कोटींचा घोटाळा!

## मोदी-शहा यांच्यावर राहुल गांधींचा गंभीर आरोप, जेपीसी चौकशी करण्याची मागणी

नवी दिल्ली । वृत्तसेवा

लोकसभा निवडणूकीचा निकाल जाहिर होवून काही तासांचाच अवधी लोटला आहे. तोच काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गृहमंत्री अमित शाह, अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेअकर मार्केट मधील माहिती जाहिर करत ३० लाख कोटी रूपयांचा आर्थिक घोटाळा केल्याचा खळबळजनक घोटाळा केला आहे. याची जेपीसी अर्थात संयुक्त संसदीय समिती मार्फत चौकशी करण्याची मागणी गांधी यांनी केली. तसेच निवडणूक निकालाचे एक्झिट पोल ज्याने जाहिर केले आणि ज्याने ते बनविले त्याचीही चौकशी झाली पाहिजे अशी मागणी त्यांनी केली.

राहुल गांधींनी भाजपचे नेते नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्यावर निशाणा साधत भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत. गुरुवारी पत्रकार परिषदेत बोलताना राहुल



गांधी यांनी भाजप नेत्यांनी देशाच्या जनतेची फसवणूक करून शेअर मार्केटमध्ये मोठा घोटाळा केल्याचे म्हटले आहे. राहुल गांधी म्हणाले, लोकसभा निवडणूक सुरू असताना अदानी यांच्या वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी देशातील जनतेला शेअर बाजारात गुंतवणूक करण्याचा सल्ला दिला होता. मात्र, निकालाच्या दिवशी ४ जूनला शेअर बाजार कोसळले. तत्पूर्वी एक्झिट पोलनंतर ३ जूनला शेअर बाजारात लक्षणीय वाढ झाली होती. पण ४ जून रोजी तो घसरला.

- खोटे एक्झीट पोल दाखवून गुंतवणुकिचा दिला सल्ला
- १३ मे रोजी अमित शहांनी ४ जूनपूर्वी शेअर्स खरेदी करण्यास सांगितले
- १९ मे रोजी मोदींनी ४ जून रोजी शेअरमार्केट विक्रम मोडील सांगितले
- १ जून रोजी मिडियाने एक्झिट पोल रिलीज केले
- ३ जून रोजी शेअरमार्केटने सर्व विक्रम मोडले
- ४ जून रोजी शेअर मार्केट एकदम कोसळले यात
- ३० लाख कोटींचे नुकसान झाले

### पहिल्या दिवशी वाढ आणि दुसऱ्याच दिवशी घट हा कटाचा भाग

यावेळी काही प्रसारमाध्यमांनी राहुल गांधी यांना सवाल केला की, या घोटाळ्यातून कोणाला फायदा झाला असे वाटते अदानीला झाला का, त्यावर राहुल गांधी म्हणाले की, अदानीला निश्चित झालेला असेल, याशिवाय भाजपाकडे सध्या परदेशातील अनेकजण आहेत. त्यांच्या मार्फत हा घोटाळा केला जाण्याची शक्यता अधिक आहे. त्याशिवाय शेअर मार्केटमध्ये एकाच दिवशी शेअर्सच्या किंमतीत घट होणे आणि लगेच दुसऱ्या दिवशीत मोठ्या प्रमाणावर वाढ होणे यावरून हा सर्व प्रकार एका कटाचा भाग असल्याचे दिसून येत असल्याचे दिसून येते.

४ जूनला शेअर बाजार कोसळणार हे माहीत असतानाही मोदी सरकारने शेअर बाजाराबाबत संभ्रम का पसरवला,' असा सवाल त्यांनी त्यांनी केला. यावेळी राहुल गांधी यांनी मीडिया चॅनेल्स आणि सर्व्हे ◀◀ पान २ वर

# संघाचा संदेश घेऊन देवेंद्र फडणवीस दिल्लीकडे रवाना

नागपूर । प्रतिनिधी

भाजप संघ परिवाराच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतील महत्त्वाच्या तीन पदाधिकाऱ्यांशी गुरूवारी (दि.६) धरमपेठ येथील निवासस्थानी चर्चा केल्यानंतर भाजप नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तातडीने दिल्लीकडे रवाना झाले. ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अमित शहा व जेपी नड्डा यांची भेट घेणार असल्याची माहिती समोर आली असून, या बैठकीत नेमके काय ठरले, याविषयी तर्क वितर्क लावले जात आहेत.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपला स्वबळावर सरकार स्थापन करण्याच्या दृष्टीने आलेले अपयश, देशभरात महाराष्ट्रासह झालेले नुकसान आणि एनडीएच्या मित्रपक्षांनी अवलंबलेले दबावतंत्र लक्षात



घेता भाजप संघ परिवारात मोठी खलबते सुरू आहेत. एकीकडे देशाचे पंतप्रधान म्हणून तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी शपथ घेण्याच्या तयारीत असतानाच या चर्चामधून नेमकं काय पुढे येणार? याविषयीची उत्सुकता राजकीय वर्तुळात लागली आहे. अलीकडेच भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष यांनी संघ परिवाराविषयी व्यक्त केलेल्या विधानावरून बरीच चर्चा रंगली. निवडणुकीत ईपीएफ पेन्शनच्या मुद्द्यावरून संघ परिवाराशी संबंधित कामगार संघटनाही भाजप विरोधात गेल्याचे उघड झाले. याविषयीची नाराजी भाजप वर्तुळात व्यक्त करण्यात आली. देशभरात भाजपला किमान ६० जागांचे नुकसान झाले. या सर्व परिस्थितीत आता सरकार स्थापनेच्या दृष्टीने यासोबतच भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाच्या निवडीच्या दृष्टीने संघ आणि भाजप यामध्ये चर्चा सुरू आहेत. राष्ट्रीय पातळीवर तसेच राज्य पातळीवर ◀◀ पान २ वर

# भीषण अपघातात चालकाचा मृत्यू

टाकरवण। प्रतिनिधी

भरधाव ट्रॅक्चरचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टरची ट्रोली पलटी होऊन चालकाचा मृत्यू झाल्याची घटना बुधवार (ता. ५) रोजी टाकरवण शिवारात घडली आहे. सचिन चव्हाण असे अपघातात मृत्यू झालेल्या ३२ वर्षीय ट्रॅक्टरचालकाचे नाव आहे.

सचिन सुंदर चव्हाण हा आपल्या ताब्यातील ट्रॅक्टरणे शेताकडून टाकरवणच्या दिशेने येत होता. टाकळगव्हाण - टाकरवण रस्त्यावर वाहनावरील ताबा सुटला आणि ट्रॅक्टर रस्त्याच्या बाजूला असलेल्या वितरीकेत गेल्याने ट्रोली पलटी होऊन भिषण आपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच जवळच्या लोकांनी घटनास्थळी दाखल होत बचावकार्य सुरु केले. यावेळी सचीन हा ट्रोली खाली दबला होता त्याला बाहेर काढत तात्काळ रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र सचीन चव्हाण याला डॉक्टरांनी मृत घोषित केले.

# अजित पवारांसाठी धोक्याची घंटा; आमदार साथ सोडणार?

## जयंत पाटलांकडून अप्रत्यक्ष दुजोरा, एका वाक्यात सांगून टाकले

मुंबई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने जोरदार मुसंडी मारली आहे. पवार यांच्या राष्ट्रवादीचे एकूण आठ खासदार निवडून आले आहेत. याच कारणामुळे अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या आमदारांमध्ये धाकधूक वाढली आहे. अजितदादांचे १८-१९ आमदार हे स्वगृही परतणार असल्याच्या चर्चांनी आता जोर धरला आहे. याबाबत रोहित पवारांनीही दावा केला होता. आता त्यांच्यानंतर जयंत पाटील यांनी अप्रत्यक्ष दुजोरा दे एका वाक्यात काय ते सांगून टाकले आहे.

लोकसभा निवडणुकीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या चार जागा पडल्या. निकालानंतर अजितदादांच्या आमदारांमध्ये अस्वस्थता असून काही आमदार पक्षाने बोलावलेल्या बैठकीला गैरहजर राहील्याने चर्चांना दुजोरा मिळत आहे. कारण लोभसभाप्रमाणेच विधानसभेचे वातावरण





राहीले तर निवडूण यायचे कसे हा प्रश्न सध्या अजितदादांच्या आमदारांसमोर आहे. तर दुसरीकडे लोकसभा निवडणुकीत शरद पवार गटाचे उमेदवार मोठ्या फरकाने विजयी झाले. पवारांना जनतेची सहानुभुती मिळत असल्याचे या निकालावरुन दिसून आले.

शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने आज त्यांच्या निवडून आलेल्या उमेदवारांचे अभिनंदन केले. ◀◀ पान २ वर

### योग्य वेळी योग्य निर्णय घेऊ

याबद्दल आम्ही आताच काही भाष्य करणार नाही. पण गेल्या दोन दिवसांपासून लोकांची मनस्थिती बदलली आहे. त्यामुळे मी त्यावर आताच काही बोलणार नाही. सध्या फार घाई करणं योग्य नाही. सध्या थोडा वेळ जाऊद्या. आम्हाला महाराष्ट्रातील जनतेच्या मताची फार काळजी आहे. आमचे अनेक आमदार गेले पण आज जनतेने लोकसभा निवडणुकीत हा निकाल दिला. आम्ही योग्य वेळी योग्य ते करू, असे जयंत पाटील म्हणाले.

### अजित पवारांच्या बैठकीत कोण-कोण अनुपस्थित?

अजित पवार गटाच्या आमदारांची आज बैठक पार पडली. या बैठकीला ५ आमदार उपस्थित नव्हते. मिळालेल्या माहितीनुसार, आमदार नरहरी झिरवळ, सुनील टिंगरे, राजेंद्र शिंगणे, अण्णा बनसोडे, धर्मराव बाबा आत्राम या आमदारांची बैठकीत अनुपस्थिती राहिली. मंत्रिमंडळाचा विस्तार आता लवकरात लवकर करावा, अशी चर्चा या बैठकीत झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. लोकसभा निवडणुकांमध्ये आलेल्या अपयशाबद्दलही या बैठकीत चर्चा झाल्याची शक्यता आहे.

# मंत्रिमंडळाचा विस्तार लवकरच

नवी दिल्ली । वृत्तसेवा

लोकसभा निवडणुकीत महायुतीला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. त्यामुळे हा पराभव विसरून आगामी विधानसभा निवडणुकीसाठी जोमाने कामाला लागण्याच्या उद्देशाने केंद्रात एनडीएचे सरकार स्थापन झाल्यानंतर काही दिवसांतच राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

एनडीएच्या बुधवारी झालेल्या बैठकीनंतर नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातील नेत्यांशी संवाद साधून पराभवाची कारणे जाणून घेतली. राज्यात मराठा आरक्षणासह उमेदवारी वाटपातील घोळ आणि शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नांकडे सरकारने ◀◀ पान २ वर

# नाखलगावला वीज पडल्याने बैलजोडी ठार तर चिमुकलीला चटका बसून इजा

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील नाखलगाव येथे आलेल्या वादळी वाऱ्यासह वीज कोसळल्याने येथील शेतकऱ्याची बैलजोडी जागीच ठार झाल्याची घटना काल (दि०६) गुरुवारी सायंकाळी साडेचार वाजता च्या दरम्यान घडली. यामध्ये शेजारी खेळत असलेल्या सात वर्षाच्या मुलीला चटका बसून किरकोळ इजा झाल्याने मोठा अनर्थ टळला.

येथील अल्पभूधारक शेतकरी बाबुराव किसन



झोडगे हे शेतातील बैल मशागतीची कामे आटोपून मोकळ्या शेतात गाडीला ◀◀ पान २ वर

# विधानसभेसाठी राष्ट्रवादीकडून नव्या चेहऱ्यांना संधी -जयंत पाटील

पुणे । प्रतिनिधी

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी जे उमेदवार दिले त्यात डॉ. अमोल कोल्हे सोडले तर उर्वरित सर्व खासदार हे पहिल्यांदा लोकसभेत जाणार आहेत. त्यामुळे लोकसभेप्रमाणे आगामी विधानसभा निवडणुकीत पक्षाकडून नव्या आणि स्वच्छ चारित्र्याच्या चेहऱ्यांना संधी दिली जाईल,



अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी गुरुवारी येथे दिली.

पुढे बोलताना जयंत पाटील म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत राज्यातील जनतेत राज्य सरकारच्या विरोधात रोष दिला. त्यामुळे राज्यातील सत्ताधारी पक्षाला मोठा फटका बसेल, असा विश्वासही व्यक्त केला. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या नवनिर्वाचित खासदारांची बैठक गुरुवारी प्रदेश कार्यालयात ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०५ जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू : १०.५० क्विंटल | | |
| २,२४१ | २,८०० | २,४६० |
| ज्वारी/हायब्रिड : ९२.०० क्विंटल | | |
| १,७४० | २,९३६ | २,२९२ |
| मूग : १.५० क्विंटल | | |
| ५,००१ | ७,१०० | ६,०५० |
| तूर : २.५० क्विंटल | | |
| ९,००१ | ११,४०० | १०,३५० |
| उडीद : ९.५० क्विंटल | | |
| २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरी: ३.५० क्विंटल | | |
| १,८०० | २,४०० | २,१०० |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | | |
| १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: ५०.५० क्विंटल | | |
| ४,००० | ४,५११ | ४,३७० |
| हरभरा: १९.५० क्विंटल | | |
| ५,८०० | ६,६०१ | ६,२६३ |



# महिला शेतकऱ्याचा मुलगा बनणार डॉक्टर

## वडीलांची छत्रछाया हरपल्यावर आईने जिद्दीने ओमकारला शिकवले

बीड-नियती कधी काय करेल, हे कोणालाही सांगता येत नाही. दोन मुले आणि एक मुलगी अवघे ५ ते ७ वर्षाचे असताना पतीचे दिर्घ आजाराने निधन झाले. मुलांना जगवायचे कसे?, त्यांचे शिक्षण करायचे कसे? हा विचार मिराबाई कांदे यांच्या मनाला वेदना देत होता. मात्र मोठ्या धाडसाने त्यांनी घरची शेती कसून आपल्या तिन्ही मुलांना शिकवले. आज त्यांचा मुलगा ओमकार हा डॉक्टर होणार आहे. त्याला पहिल्या प्रयत्नात नीटमध्ये ६५७ गुण मिळाले असून मुलाला डॉक्टर करण्यासाठी एका महिला शेतकऱ्याने शेतीत केलेले कष्ट आज खऱ्या अर्थाने कामी आले आहेत.

माजलगाव तालुक्यातील मिराबाई लक्ष्मण कांदे यांना तीन मुलं आहेत. २०१२ साली त्यांचे पती लक्ष्मण यांचे वयाच्या २५ वर्षातच दिर्घ आजाराने निधन झाले. यावेळी त्यांचा लहान मुलगा ओमकार हा ५ वर्ष, ऋषिकेश ६ आणि मुलगी ज्योती ही ८ वर्षाची होती. लक्ष्मण हे ◀◀ पान २ वर

### डॉक्टर होऊन कलेक्टर व्हायचयं-ओमकार कांदे

माझे वडील मला फक्त फोटोमुळे माहित आहेत. ते आम्हाला सोडून गेले त्यावेळी मी फक्त ५ वर्षाचा होतो. त्यावेळी मला काहीच कळत नव्हते. पण आम्ही भावंडं मोठे अधिकारी व्हावेत, अशी वडीलांची इच्छा होती, असे आईने सांगितल्यावर मी जिद्दीने आभ्यास केला. डॉक्टर होण्यासाठी खूप अभ्यास केला. आज मला नीटमध्ये चांगले गुण मिळाले असून डॉक्टर झाल्यावर युपीएसीची तयारी करुन कलेक्टर होण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे. आई आणि वडीलांचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी मी कलेक्टर होणार असल्याची प्रतिक्रिया ओमकार कांदे यांनी दिली.

cmyk

## अग्रलेख

# काँग्रेसचा हात जनतेच्या हातात!

भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) २९४ जागा जिंकून केंद्रात सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापनेच्या दिशेने कूच केली आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीनेही २३२ जागा जिंकून एनडीएला जोरदार टक्कर देत त्यांच्या नाकीनऊ आणले. अन्य पक्षांना १७ जागा मिळाल्या. गत निवडणुकीत भाजपने स्वबळावर ३०३ जागा जिंकून बहुमत मिळवले होते. मात्र यावेळी भाजपला केवळ २३९ जागा मिळाल्याने त्यांना मित्रपक्षांच्या मदतीने सरकार स्थापन करावे लागणार आहे. गत लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या जागांपैकी सुमारे ६४ जागा भाजपने यावेळी गमावल्या आहेत. गत निवडणुकीत काँग्रेसला केवळ ५२ जागा मिळाल्या होत्या. यावेळी काँग्रेसने १०० जागांपर्यंत मजल मारली आहे. म्हणजे काँग्रेसचे संख्याबळ ४८ जागांनी वाढले आहे. यंदाच्या निवडणुकीत भाजपची सर्वाधिक भिस्त उत्तर प्रदेशावर होती; परंतु तेथे भाजपला जोरदार चपराक मिळाली. त्या राज्यात समाजवादी पक्षाने भाजपच्या तोंडाला फेस आणला.

महाराष्ट्रात महाविकास आघाडीने महायुतीला चपराक दिली. महाविकास आघाडीने ३१ जागा जिंकून भाजपचे गणित बिघडवले. महाराष्ट्रात भाजपने जे फोडाफोडीचे राजकारण केले त्याला जनतेने खरपूस उत्तर दिले आहे. गत दोन वर्षांत भाजपने महाराष्ट्रात जे कूटनीतीचे राजकारण केले ते त्यांच्यावरच बूमरँगसारखे उलटल्याचे लोकसभा निकालावरून दिसून आले आहे. नैतिकतेचा टेंभा मिरवणाऱ्या भाजपने राज्यात जे घाणेरडे राजकारण केले त्याला मतदारांनी मतपेटीद्वारे पूर्णत: झिडकारले आहे. ही एक प्रकारे भाजप, मोदी व फडणवीसांना मोठी चपराकच आहे. यंदाच्या निवडणुकीत भाजप स्वबळावर ३७० जागा जिंकणार आणि रालोआ 'अब की बार चारसौ पार' जाणार, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपचे सर्वच नेते व्यक्त करीत होते. मात्र 'चारसौ पार'च्या विश्वासाचा फुगा महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, हरियाणा, राजस्थान आणि पश्चिम बंगालने फोडला. लोकसभा निवडणुकीचे मतदान पार पडल्यानंतर लगेच मतदानोत्तर चाचण्यांचे निकाल जाहीर होऊ लागले. त्यात रालोआच्या घोषणेप्रमाणे ४०० पारचा आकडा गाठणार, असे निष्कर्ष जाहीर झाले. त्यामुळे भाजपसह त्यांचे मित्र पक्ष आणि समर्थक यांना आकाश ठेंगणे झाले. मात्र मंगळवारी प्रत्यक्ष निकाल जाहीर होताच रालोआ, मित्र पक्ष आणि समर्थक जमिनीवर आले. यंदाच्या निवडणुकीने 'मोदी की गॅरंटी' निष्प्रभ ठरल्याचे दाखवून दिले आहे. अलीकडे भाजप म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मोदी म्हणजे भाजप, असे राजकीय समीकरणच बनले होते. मोदी हेच भाजपचे 'वन मॅन शो' बनले होते. निवडणूक काळात मोदींनी प्रचारसभांचा धडाका लावत सारा भारत पिंजून काढला होता. 'मोदी है तो मुमकीन है' हाच विश्वास भाजपच्या नेतेमंडळींना होता. त्यामुळेच 'अब की बार चारसौ पार', 'काँग्रेसमुक्त भारत'चे नारे दिले गेले होते. वास्तविक पाहता गत दहा वर्षांत देशात 'मोदीराज' होते. या काळात त्यांना 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' सिध्द करण्यास खूप वाव होता. पण मोदी सरकारची गाडी प्रारंभापासूनच रुळावरून घसरली. काँग्रेसला चावे घेण्याचे काम मात्र त्यांनी मोठ्या आवडीने केले. देशातील काळा पैसा खणून काढून प्रत्येक नागरिकाच्या बँक खात्यात १५ लाख रुपये जमा करण्याचा वायदा केवळ 'जुमलेबाजी' ठरला. देशातील भ्रष्टाचार न संपता उलट वाढत गेला. देशातील स्वायत्त संस्थांच्या कारभारात कमालीचा हस्तक्षेप वाढला. महिलांवरील अन्याय-अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली. बहुचर्चित 'नोटाबंदी' चा निर्णय साफ चुकला, त्याची मोठी किंमत सामान्य नागरिकांना बँकेच्या रांगेत उभे राहून चुकवावी लागली. 'एक देश एक कर' या गोंडस नावाखाली देशात लागू करण्यात आलेल्या जीएसटी करप्रणालीने छोटा व्यापारी वर्ग उद्‌ध्वस्त झाला. कोरोना काळात देशवासीयांना कधी 'थाळ्या वाजवा', कधी 'मेणबत्त्या पेटवा' असे आवाहन करून अवैज्ञानिक मुद्यांचे समर्थन करण्यात आले. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आणि शेतमालाला हमीभाव देण्याचे आश्वासन मोदी सरकार विसरले. त्याविरुध्द शेतकऱ्यांची आंदोलने चिरडण्यासाठी बळाचा वापर करण्यात आला. वांशिक दंगलीने मणिपूर पेटले; परंतु पंतप्रधानांनी मणिपूरला भेट दिली नाही. मोदी सरकारच्या कालावधीत जातीपातीतील भांडणे तीव्र झाली, धार्मिक विद्वेष वाढीस लागला. महाराष्ट्रासह काही राज्यांतील सरकारे उलथवून टाकण्यात आणि राजकीय पक्षांमध्ये फोडाफोडी करण्यात मोदी सरकारने विशेष रस दाखविला. मराठी-गुजराती या सुप्त संघर्षाला हवा देण्याचे प्रयत्न झाले. निवडणुकीत सरकारी यंत्रणांचा दुरुपयोग झाला. यंदाच्या निवडणुकीत 'मोदी मॅजिक' चालले नाही.

आपल्या प्रचार सभांमधून मोदींनी केवळ विरोधकांवर टीका करण्यातच धन्यता मानली. काँग्रेसला चावे घेण्याची एकही संधी त्यांनी सोडली नाही. आपल्या दहा वर्षांच्या कारकीर्दीत मोदींनी एकच काम केले ते म्हणजे काँग्रेसवर आरोप, पंडित नेहरूंपासून मनमोहन सिंग या माजी पंतप्रधानांवर बेलगाम आरोप. जनतेला ते अजिबात आवडले नाही. 'काँग्रेसमुक्त भारत'चा नारा त्यांनी सातत्याने दिला. त्यासाठी साम-दाम-दंड-भेद नीतीचा वापर केला. संसदीय प्रथा, परंपरांना तिलांजली दिली. काँग्रेसकडे संघटना, पैसा नव्हता. राहुल गांधींनी जनतेसाठी, लोकशाहीसाठी लढा उभारला. शून्यातून पक्ष पुन्हा उभा केला. द्वेषाला प्रेमाने उत्तर देण्यासाठी 'मुहब्बत की दुकान', 'भारत जोडो यात्रा' काढली. शेतकऱ्यांसह उपेक्षित घटकांना हलाखीचे जीणे जगावे लागत आहे, सरकारला त्याची चिंता नाही, हा राहुल गांधींचा मुद्दा देश पातळीवर प्रभावी ठरला. जनतेने 'काँग्रेसमुक्त' नव्हे 'काँग्रेसयुक्त भारत' हवा आहे हे आपल्या कौलातून दाखवून दिले आहे.



परळीः राष्ट्रीय महामार्गावर परळी शहरातील वैद्यनाथ महाविद्यालय समोरील अपघातास कारणीभूत ठरत असलेल्या गतीरोधकला सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रंग देण्यात आला. सोमवार दि ३ रोजी हे गतिरोधक न दिसल्याने ऑपेरिक्षा पलटी होऊन महिलेला जीव गमवावा लागला होता.

# नाभिक समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व जिल्हा मेळाव्याचे माजलगांव येथे आयोजन

## कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे-प्राचार्य डी.डी.राऊत

**वडवणी । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र नाभिक महामंडळ बीड जिल्हा आयोजित नाभिक समाजातील १०वी १२वी व निट परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व विविध स्पर्धात्मक परीक्षांमध्ये जसे डॉक्टर,इंजिनिअर,वकील,नागरीसेवा, शासकीय निमशासकीय नोकरी मीळवलेल्या गुणवंतांचा गुणगौरव सोहळा व जिल्हास्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.**

गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन करत आले आहे तरी यावर्षीही गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन दि.१० जून २०२४वार सोमवार रोजी सकाळी ११वा. वैष्णवी मंगल कार्यालय गजानन मंदिर रोड,माजलगाव येथे करण्यात आले आहे तरी सर्व विद्यार्थ्यांनी व पालकांनी,या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे जिल्हाध्यक्ष दिलीप झगडे व महाराष्ट्र नाभिक कर्मचारी महामंडळाचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य डी.डी.राऊत यांनी केले आहे.



महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणरावजी दळे यांच्या शुभहस्ते स्वागत करण्यात येणार आहे तर या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रदेश उपाध्यक्ष भगवानराव वाघमारे हे राहणार आहेत तर प्रमुख उपस्थिती म्हणून महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेश कार्याध्यक्ष दामोदर काका बिडवे, प्रदेश सरचिटणीस पांडुरंग भवर, कर्मचारी महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष उत्तमराव सोलाणे, युवक प्रदेशाध्यक्ष सुरेंद्र भैय्या कावरे, बारा बलुतेदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाशराव कानगावकर, मराठवाडा अध्यक्ष युवराज शिंदे हे उपस्थित राहणार आहेत तरी बीड जिल्ह्यातील नाभिक समाजातील गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थ्यांनींनी व नाभिक समाजातील नागरिकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्राचार्य डी.डी.राऊत यांनी केले आहे.

# महाराष्ट्र ग्रामीण बॅंक आयोजित महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रा

**तांदळा । प्रतिनिधी**

शेतकरी वर्गाना पिक कर्ज नुतनीकरण, व्याज परतावा तसेच शासनाच्या प्रोत्साहनपर योजनेचे महत्त्व पटवून सांगण्यासाठी व त्यांच्यासोबत संवाद साधण्यासाठी महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेचे दि, ५ जुन ते १५ दरम्यान आयोजन करण्यात आलेले आहे, संपूर्ण मराठवाड्यात तब्बल ५० ठिकाणी कार्यक्रम घेण्यात येणार असून या दरम्यान २००० नियमित पिक कर्ज धारकांचा सत्कार व २००० वक्षारोपन देखील बॅंके मार्फत करण्यात येणार आहे, सदर यात्रा ५ जुन पासुन छत्रपती संभाजीनगर येथुन सुरु होवुन दोन वेगवेगळ्या नांदेड येथे १५ जून ला एकत्र येणार आहे, या यात्रेचा दि, १५ जुन रोजी नांदेड येथे समारोप होणार आहे, या यात्रेतील एक टिम छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली व नांदेड तसेच दुसरी टिम छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, लातूर ते नांदेड या मार्गाने मार्गक्रमण करणार असून त्या दरम्यान एटीएम मशीन चे प्रात्यक्षिक तसेच आर्थिक समावेशन, डिजिटल साक्षरता आणि सामाजिक सुरक्षा योजने बद्दल जनजागृती करण्याचे काम देखील बॅंकेमार्फत करण्यात येईल, सदरील यात्रेचे दि, ९ जुन रोजी बीड जिल्ह्यातील आगमन होणार असून त्या दिवशी महाराष्ट्र ग्रामीण बॅंक शाखा कोळगांव आणी तलवडा या कार्यक्षेत्रात येणाऱ्या गांवागांवा मध्ये कार्यक्रम घेण्यासाठी ही यात्रा येणार आहे, त्या सोबतच दि, १० जुन रोजी महाराष्ट्र ग्रामीण बॅंक शाखा किटी आडगांव सिरसाळा येथे कार्यक्रम घेवुन यात्रा दि, ११ जुन रोजी घाटनांदूर येथे कार्यक्रम करण्यात येईल व त्यानंतर यात्रा लातूर जिल्हात प्रवेश करेल , या महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेत बॅंकेचे सर्व सन्मानिय ग्राहक, गावातील प्रतिष्ठीत नागरीक, बचत गटातील महिला वर्ग तसेच संबधित शासकीय अधिकारी, कर्मचारी या सर्वांनी आपापल्या गांवात येणाऱ्या महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेत मोठ्या संख्येने सामील होण्याचे व त्याचा लाभ घेण्याचे आवाहन महाराष्ट्र ग्रामीण बॅंकेमार्फत करण्यात येत आहे,

# सामाजिक सलोखा जपुन व राजकीय हेवेदावे विसरून समाजात शांतता राखा-सागर शेकडे

**म्हसोबावाडी। प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील उंदरखेल ग्रामपंचायतचे उपसरपंच सागर(दादा)शेकडे यांनी झालेल्या लोकसभेच्या तनावपुर्व वातावरणामुळे आप आपसात जो जातीय तेढ निर्माण झाला याला कुठं तरी थांबवलं पाहिजे व कायदा सुव्यवस्थेला सहकार्य करुन शांत राहिलं पाहिजे असं सांगितलं व राजकारण हे तेवढ्या पुरतेच केलं ही पाहिजे असं सांगितलं अन्? हल्ली गाव खेड्यात होणारे अनुसूचित प्रकार व सोशल मिडियाचा चालेला गैरवापर सारा थांबवला पाहिजे सर्व जाती धर्माच्या लोकांनी आपण जसे पहिले गुण्यागोविंदाने राहत होतो बोलतं होतो तसे आज ही वागलं पाहिजे कारण राजकारण कोणत्याही पदासाठी असो ते म्हणजे फक्त एक खेळ आहे अन्? खेळ म्हणलं की एकाची हार तर दुसऱ्याची जित असतेच यात काही शंका नाही म्हणूनच आप आपसात वाद का...?असा सागर (दादा)शेकडे यांनी जनतेला प्रश्नं ही विचाराला आहे.. उगाच कोणत्याही पोस्टला गलिच्छ अभिप्राय देणं किंवा गलिच्छ पोष्ट सोशल मिडियावर करणं शोभा देतं नाही कारण आपण सर्वांनी संतांच्या भुमीवर जन्म घेतला आहे अन्? सर्व महापुरुषांचा वारसा ही जपला पाहिजे उगाच आपल्या एखाद्या पोस्ट मुळे किंवा एखाद्या शब्दांमुळे समाजात, कुटुंबात तेढ निर्माण होऊन कलह होऊ शकतो त्यामुळे माझे तमाम बीड लोकसभा मतदारसंघाच्या सर्व जनतेस हात जोडून विनंती आहे की सामाजिक सलोखा जपुन आपले संबंध चांगले ठेवा व आपल्या एका चुकीमुळे जर संबंध बिघडत असतील तर हे राजकारण काय कामाच..तुम्ही कशाने सुज्ञान नागरीक आहात? असा संभ्रम निर्माण होतो सोशल मिडियावर व समाजामध्ये शांतात राहवी यासाठी पोलिस प्रशासन नेहमीच काळजी घेतली आहे अन्? या पुढे ही घ्यावी अशी मागणी युवा उद्योजक सागर(दादा)शेकडे यांनी केली आहे ते काल दिलेल्या प्रसिद्धीपत्राद्वारे सांगितले.



## पान १वरून...

### अजित पवारांसाठी धोक्याची घंटा

त्यानंतर पत्रकार परिषद घेऊन विजयी उमेदवारांची ओळख करून देण्यात आली. यावेळी जयंत पाटील यांनी वेगवेगळ्या विषयांवर भाष्य केलं. पत्रकारांनी त्यांना सध्या चालू असलेल्या आमदारांच्या इन्कमिंगच्या चर्चेवर प्रश्न विचारला. काही लोक तुमच्या संपर्कात आहेत, असे सांगितले जात आहे. या लोकसभा निवडणुकीत वेगवेगळ्या विधानसभा मतदारसंघांमध्ये लीड घटल्यामुळे अजित पवार यांच्या राष्ट्रवादीतील काही आमदार स्वगृही परतणार असल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे खरंच काही आमदार तुमच्या संपर्कात आहेत का? असा प्रश्न पत्रकाराने केला. यावर जयंत पाटील यांनी एका वाक्यात उत्तर दिले. सध्या माझ्या मोबाईलचा वापर वाढला आहे, एवढच सांगतो, असे जयंत पाटील म्हणाले.

### डीएपी, युरीया किटकनाशकाची

प्रमाणीत भ्रष्टाचार केला जात आहे. ही दोन्ही प्रकरणे गंभीर असून या प्रकरणांची चौकशी करण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.

विजय वडेट्टीवार पुढे बोलताना म्हणाले की, शेतकऱ्यांना ब्रँडचे नॅनो डीएपी व नॅनो युरीया अनुदानावर वाटप करण्यासाठी अनुक्रमे ११५.४९ कोटी व ४३.३० कोटी असे एकूण रू. १५८.७९ कोटी शासनाकडून मंजूर करण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना मेटाल्डीहाईड किटकनाशक वाटप करण्यासाठी २,५०,००० कीलो पोटी रू.२५.१५ कोटी अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

### शेअर बाजारात ३० लाख

कंपन्यांच्या एक्झिट पोलवरही प्रश्न उपस्थित केले. मीडियाने खोटे एक्झिट पोल का दाखवले, असा सवाल त्यांनी केला. गांधी म्हणाले की, 'निवडणुकीच्या वेळी तत्कालीन पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी शेअर बाजारावर भाष्य केले. पंतप्रधान शेअर बाजाराच्या वाढीबद्दल बोलत असताना गृहमंत्र्यांनी सांगितले की, लोकांनी ४ जूनपूर्वी शेअर्स खरेदी करावेत. पण ४ जून रोजी बाजार कोसळला. शेअर बाजारामुळे देशाचे ३० लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले. त्यामुळे आम्ही बनावट एक्झिट पोल आणि शेअर बाजारातील घोटाळ्याची जेपीसी चौकशी व्हावी अशी अमची मागणी आहे,' असे राहुल गांधींनी स्पष्ट केले. राहुल गांधी पुढे बोलताना म्हणाले की, या गोष्टीची साखळी बघितली तर एक्झिट पोल मध्ये सुरुवातीला जाहिर करण्यात आलेले आकडे. या आकड्यांचा खेळ हाही त्या साखळीचा भाग आहे. त्यामुळे एक्झिट पोलचे आकडे कोणी तयार केले याची चौकशी झाली पाहिजे असे ते म्हणाले. स्टॉक मार्केटमधील शेअर्सची किंमत कधी वाढणार आहे, याची माहिती अमित शाह, पंतप्रधान मोदी यांना कशी माहिती. तसेच निवडणूक निकालाच्या तोंडावरच ती कशी जाहिर करण्यात आली. यावरून या संपूर्ण घोटाळ्याचे धागेदोरे बाहेर आले पाहिजेत असेही ते म्हणाले.

### संघाचा संदेश घेउन

नेतृत्वात बदलाच्या दृष्टीनेही यात चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

सध्या नागपुरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तृतीय वर्ष कार्यकर्ता विकास प्रशिक्षण शिबिर सुरू असून १० जूनला त्याचा रेशीमबाग स्मृतीमंदिर परिसरात समारोप होणार आहे. या कार्यक्रमात सरसंघचालक डॉ. मोहन भागवत हे देशातील लोकसभा निवडणूक निकाल आणि यानंतरच्या घडामोडींवर काय भाष्य करणार, याकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर भाजप आणि संघ परिवारातील या चर्चांचा मतितार्थ काय? हे येणाऱ्या दिवसात दिल्ली, मुंबईत होणाऱ्या घडामोडीतून स्पष्ट होणार आहे.

### महिला शेतकऱ्याचा मुलगा

पदवीधर असल्याने आपले मुलेही चांगली शिकावित आणि मोठे अधिकारी व्हावेत, असे स्वप्न होते. मात्र नियतीला काही तरी वेगळेच मान्य होते. लक्ष्मण यांच्या जाण्याने कुटुंब उघड्यावर पडले होते. मुलांची छत्रछाया हरपली होती. लक्ष्मण यांना आश्रुबा आणि रामभाऊ हे दोन मोठे भाऊ आहेत. मात्र त्यावेळी कुटुंब स्वतंत्र असल्याने मिराबाई यांच्यासमोर मुलांचे शिक्षण, त्यांना लहानाचे मोठे करण्याचा मोठा प्रश्न होता. घरी ३-४ एकर जमीन असल्याने मिराबाईने स्वत: जमीन कसण्याचे ठरवले. त्यांना आश्रुबा आणि राम कांदे यांनी मोठी साथ दिली. शेतीत राबराब राबून जे पैसे शिल्लक राहत होते. यातून कुटुंबाचा उदरनिर्वाह होत होता. तिन्ही मुले शिक्षणात हुशार असल्याने मिराबाई आपल्या मुलांच्या शिक्षणावरुन चिंतीत होत्या. त्यातच पसायदान सेवा प्रकल्पाचे संचालक गोवर्धन दराडे यांनी मिराबाई कांदे यांची भेट घेऊन ओमकार आणि ऋषिकेश यांना शिक्षणासाठी दत्तक घेण्याची तयारी दर्शवली. त्यानंतर कसलाही वेळ न जाऊ देता मिराबाई यांनी मुलांना दराडे सरांच्या स्वाधिन केले. स्वत: शेतीत कष्ट करुन गरज पडली तर मुलांच्या शैक्षणिक साहित्यासाठी त्या पैसे पुरवत होत्या. दोन्ही मुलांचे शिक्षण चांगल्या पध्दतीने पसायदानमध्ये होत गेले. पुढे पसायदान प्रकल्प ढेकणमोह येथे स्थलांतरीत झाल्यावर ओमकार आणि ऋषिकेश यांनी पुढील शिक्षण बीडमध्येच घेतले. याकामी त्यांना त्यांचे मेहुणे सचिन नागरगोजे यांनी मोलाची साथ दिली. ओमकार लहानपणापासूनच हुशार असल्याने त्याच्यावर मिराबाई यांनी विशेष लक्ष दिले. शेतीतील कष्ट त्यांनी वाढवून ओमकारला शिकवणी लावल्या. आज ओमकारने पहिल्या प्रयत्नात नीटमध्ये ६५७ गुण घेतले असून तो आता एमबीबीएस डॉक्टर होणार आहे. वडीलांचे स्वप्न ओमकार पुर्ण करणार असल्याने आज कांदे कुटुंबामध्ये आनंदमयी वातावरण आहे.

### नाखलगावला वीज पडल्याने

बैलांना बांधून कुटूंबासह इतर शेतीकामात व्यस्त होते. पावसाला सुरुवात होण्याअगोदर वादळी वाऱ्यासह विजाचा कडकडाट चालू होता. यावेळी झोडगे यांच्या १ लाख २० हजार रुपये किंमतीच्या दोन्ही खिल्लार बैलांवर वीज पडल्याने बैल जागीच ठार झाले. बाबुराव झोडगे यांची सात वर्षांची नातीस (स्वरा दत्ता झोडगे) बैलाजवळ खेळत असताना विजेचा चटका बसल्याने किरकोळ इजा झाली. ऐन पेरणीच्या तोंडावर या शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून नाखलगावकरांत हळहळ व्यक्त होत होती. महसूल प्रशासनाने तात्काळ पंचनामे करत पीडित शेतकऱ्यास मदत करण्याची मागणी शेतकऱ्यांसह ग्रामस्थांनी केली.

### मंत्रिमंडळाचा विस्तार लवकरच

दुर्लक्ष केल्यामुळे भाजप व महायुतीला पराभवाचा धक्का बसल्याची माहिती राज्यातील नेत्यांनी मोदी यांना दिली. सरकारविरोधातील असंतोषामुळे अल्पसंख्यांक, दलित, धनगरांसह मराठा समाजातील मोठा वर्ग महाविकास आघाडीकडे गेल्याचे मोदी यांना सांगण्यात आले. त्यावर हा पराभव विसरून आता विधानसभा निवडणुकीसाठी जोमाने कामाला लागा, अशी सूचना मोदी यांनी महायुतीच्या नेत्यांना केल्याची माहिती सूत्रांनी दिली. लोकसभेतील पराभवातून बाहेर पडून महायुतीमध्ये नवा जोश निर्माण करण्यासाठी पुढील पंधरा दिवसांत राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाकडून केली जाणार असल्याचेही सांगण्यात येत आहे.

### विधानसभेसाठी राष्ट्रवादीकडून

पार पडली. या बैठकीला राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह डॉ. अमोल कोल्हे, अमर काळे, बजरंग सोनावणे, बाळ्यामामा म्हात्रे, धैर्यशील मोहिते- पाटील, भास्कर भगरे, उपस्थित होते. सुप्रिया सुळे आणि निलेश लंके हे नियोजित कार्यक्रम असल्याने येऊ शकले नाहीत. या बैकठीनंतर जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत बोलताना लोकसभेप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही नव्या चेहऱ्यांना संधी देण्याचे स्पष्ट संकेत दिले. जयंत पाटील पुढे बोलताना म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वखालील राष्ट्रवादी काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागल्याने त्यांच्या पक्षाचे १८ ते १९ आमदार पुन्हा शरद पवार गटात परतणार असल्याची चर्चा असल्याबाबत विचारले असता, जयंत पाटील यांनी या प्रश्नावर बोलण्याचे टाळले. काही आमदार रोहित पवार यांच्या संपर्कात असतील. मात्र, मी या विषयावर योग्य वेळी बोलेन असे सांगत आमदार गेल्यामुळे आमचा पक्ष स्वच्छ झाला आहे. त्यामुळे परत येऊ इच्छिणाऱ्या आमदारांबाबत योग्यवेळी योग्य निर्णय घेऊ, असेही यावेळी सांगितले.

पुढे बोलताना जयंत पाटील म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत पिपाणी चिन्हामुळे पक्षाला फटका बसला. पिपाणी चिन्हाला सरासरी ४५ ते ५० हजार मतदान झाले आहे. एकट्या दिंडोरी लोकसभा मतदारसंघात पिपाणी चिन्हाला १ लाख ३ हजार मते मिळाली. तर सातारा लोकसभा मतदारसंघाची जागा आम्ही ३२ हजार मतांनी गमावली. सातारा मतदारसंघात पिपाणी चिन्हाला ३७ हजार मते मिळाली आहेत. पिपाणीचा प्रचार तुतारी असा केला गेल्याने आम्हाला फटका बसला. त्यामुळे पिपाणी चिन्हाविषयी निवडणूक आयोगाकडे जाणार असल्याचेही यावेळी सांगितले.

### खूषखबर! मान्सून महाराष्ट्रात

तशी अधिकृत घोषणा हवामान विभागाने गुरुवारी दुपारी ४ वाजता केली. आगामी १२ ते १६ तासांत तो पुणे, मुंबई शहरात दाखल होईल, असा अंदाज आहे. त्यामुळे संपूर्ण राज्याला यलो अलर्ट हवामान विभागाने दिला असून ७ ते ९ जूनपर्यंत राज्यात मुसळधारेचा अंदाज दिला आहे.हवामान विभागाने यंदा मान्सून राज्यात ५ जून रोजी येईल, असा अंदाज वर्तवला होता. मात्र हवेचे दाब अनुकूल नसल्याने तो यंदा नियोजित तारखेपेक्षा एक दिवस उशीरा ६ जून रोजी आला. मागच्या वर्षीच्या तुलनेत दहा दिवस आधी पाऊस आला आहे. गेल्या चार दिवसांत तो गोवा भागातून इंचभर पुढेही सरकला नव्हता. कारण हवेचे दाब राज्यात १००६ हेक्टोपास्कल होते. ते गुरुवारी दुपारी १००४ हेक्टोपास्कल इतके झाले. त्यामुळे मान्सूनला अनुकूल वातावरण तयार होताच पावसाने राज्यात प्रवेश केला. आता तो वेगाने पुणे, मुंबई शहरात काही तासांच्या आत दाखल होण्याची शक्यता असून संपूर्ण राज्यात १० ते १४ दरम्यान दाखल होईल असा अंदाज आहे.

**ईशान्य शाखा मात्र अडखळली**

ईशान्य भारतात केरळच्या दोन दिवस आधीच मान्सून पोहोचला होता. त्याची गती रेमल चक्रीवादळामुळे वाढली. पण पुढे वादळ शांत होताच मान्सूनला पुढे जाण्यासाठी स्थिती अनुकूल राहिली नाही. त्यामुळे तो गेल्या आठ दिवसांपासून अडखळलेला आहे.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार, दि. ७ जून २०२४


# गेवराईच्या संस्कृती आतकरे हिने नीट परीक्षेत मिळवले घवघवीत यश

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील रहिवासी असलेल्या संस्कृती आतकरे हिने नुकत्याच झालेल्या नीट परीक्षेत घवघवीत यश मिळवले असून ६२५ गुण घेत एम बी बी एस या कोर्ससाठी ती पात्र ठरली आहे. गेवराई येथील रहिवासी डॉ. भगवान आतकरे यांची कन्या संस्कृती आतकरे हिने नुकत्याच झालेल्या २०२४ नीट परीक्षेत ६२६ गुण घेत घवघवीत यश मिळवले आहे. तिच्या या यशाने सर्वत्र तिचे कौतुक होत असून, एमबीबीएस या कोर्स साठी ती पात्र ठरली आहे.



# नगर परिषदेने पावसा अगोदर नदी व नाल्यांच्या सफाईचे काम सुरू करावे-जगताप

**बीड । प्रतिनिधी**

**मान्सून तोंडावर आला असून आता बीड नगर परिषदेने नदी व नाल्यांच्या सफाईच्या वांजोट्या बैठका बंद करून प्रत्यक्ष कामावर लक्ष केंद्रित करावे. याबरोबरच जे.से.बी., ट्रॅक्टर आदी मशनरीसह स्वतंत्र मजुरांची नियुक्ती करुन नदी व नाल्यांच्या साफ-सफाईचे काम वेगाने करावे अशा सूचना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांना दिल्या आहेत.**

बिंदुसरा नदीपात्रात मोठमोठी बाभळीची झाडे उगवली आहेत. त्यामुळे नदीचे पात्र अरूंद व अस्वच्छ झाले आहे. या झाडांना पाणी अडुन पाणी शहरात घुसण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे तातडीने साफसफाई करण्याची आवश्यकता आहे. शहरातील आसपासच्या भागातील कचरा, घाण पाणी तसे रूग्णालयातील घातक कचरा उचलुन बिंदुसरा नदीपात्रात टाकला जात असल्याने नदीचे पात्र अरूंद होण्याबरोबरच नागरीकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असुन रूग्णालयातील जैविक घातक कच-यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे त्यामुळे संबंधित प्रकरणात दंडात्मक कारवाई करण्यात यावी. याबरोबरच बिंदुसरा नदीपात्रा शेजारील राहणा-या तब्बल ३०० घरांना महापुराचा धोका असुन नगरपालिकेकडुन कोणतीही



उपाययोजना करण्यात येत नाही. यापुर्वीही अशा दुर्घटना घडुन वित्तहानी व जिवितहानी झालेली असुन शहरातील मोमीनपुरा, खासबाग,जुना मोंढा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,पेठ बीड भागातील लोकांची पुर आल्यानंतर तारांबळ उडते. त्यामुळे तातडीने उपाययोजना करण्यात यावी. मान्सूनचे आगमन अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपले आहे. मात्र अद्याप अपेक्षित अशी कृती बीड नगर परिषदेकडून दिसत नाही. मान्सूननंतर सफाईसफाईचे काम करणे अशक्य असून नदी नाल्यांची मान्सूनपूर्व साफसफाई न झाल्यास बीडवासियांना मोठ्या अडचणींना सामोरे जाण्याची वेळ येईल. यामुळे बीड नगर परिषदेने तात्काळ आपली यंत्रणा नदी नाल्यांच्या साफसफाई साठी मार्गस्थ करावी. अशा सूचना अनिलदादा जगताप यांनी बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांना दिल्या आहेत.



किल्ले धारूर: येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरामध्ये छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा करताना सर्व समाज बांधव.

# खते आणि बियाण्यांची चढ्या भावाने विक्री करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा-ॲड.देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

**पावसाळा सुरू झाल्यात जमा आहे. त्यामुळे शेतकरी बि बीयाने आणि खते खरेदी करण्यासाठी धाव घेत आहेत. जिल्ह्यात चढ्या भावाने बी बियाणे आणि खते विक्री सर्रास चालू आहे. मात्र कृषी विभागाचे अधिकारी झोपलेले आहेत. जिल्हा प्रशासन कसलीही दखल घेत नाही. उन्हाळ्यातील पाणी आणि चारा टंचाई मुळे शेतकरी अगोदर त्रस्त असल्याने चढ्या भावाने होणारी विक्री रोखण्यासाठी कृषी खात्याचे अधिकारी पुढे आले नाहीत, तर त्यांच्या दारात आंदोलन करू, असा इशारा जन आंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांनी दिला आहे.**



राज्याच्या कृषी विभागात देखील प्रचंड अनागोंदी माजली असून राज्य शासन याकडे लक्ष देत नाही. कृषी खात्याला प्रवीण गेडाम हे चांगले आयुक्त होते. मात्र भ्रष्ट प्रशासनाने त्यांची बदली केली. गेडाम यांची बदली झाली नसती, तर जिल्ह्यातील ही अनागोंदी आम्ही रोखली असती. या बाबी आम्ही आयुक्तांच्या लक्षात आणून दिल्या होत्या. शेतकरी सध्या हातबल आहे. गेल्या काही वर्षात शेतीने शेतकऱ्याला म्हणावी अशी साथ दिली नाही. त्यामुळे चढ्या भावाने होणारी विक्री शेतकऱ्यांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. त्याशिवाय बोगस बियाणे विकले जाण्याची देखील शक्यता आहे. कृषी खात्याने याकडे देखील लक्ष देण्याची आवश्यकता आहे. जून महिना हा राज्याच्या कृषी विभागाचा सुगीचा काळ असतो. या काळात कृषी विभाग शेतकऱ्यांच्या समस्या कडे पाहत नसते. मात्र जिल्हा प्रशासनाने आता चढ्या होणारी विक्री रोखण्यासाठी पुढे यावे. अन्यथा कृषी अधिकाऱ्यांच्या दारात आम्हाला आंदोलन करावे लागेल, असेही अँड. देशमुख यांनी म्हटले आहे.

# वन शहीद वन ट्री अभियानाची ग्रीन आर्मीच्यावतीने सुरुवात-कुलकर्णी

**आंबेजोगाई । प्रतिनिधी**

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित एनसीसी विभाग व ग्रीन आर्मी यांच्या संयुक्त विद्यमाने जून ते सप्टेंबर या कालावधीत ऑपरेशन ''ग्रीन अर्थ ''अंतर्गत ५३० शहीद जवानांच्या स्मृती प्रित्यर्थ वृक्षारोपण अभियानात राबवण्यात येणार आहे या अभियानात जे जवान कारगिल युद्धात शहीद झाले, ज्या ५३० जवानांनी देश सेवेसाठी आपले प्राण गमावले आणि देशाचे रक्षण केले आणि अतिशय अवघड अशी कारगिल ची लढाई केवळ प्रचंड देशभक्ती ,दुर्दम्य आत्मविश्वास व साहस या बळावर जिंकली त्या जवानांच्या स्मृती वृक्षारोपाने जपण्या साठी यावर्षी हे अभियान दोन महिने १७ दिवस चालून विविध शाळा-



महाविद्यालय प्रामुख्याने टेकडी, स्मशानभूमी ,शेत जमीन, तलाव या ठिकाणी वृक्ष लागवड करून ज्याप्रमाणे हे वृक्ष निस्वार्थ प्रमाणे इतरांना सावली ,फळे ,ऑक्सिजन देतात तोच गुणधर्म जे युद्धात शहीद झालेले सैनिक त्यांनीही देशात स्वातंत्र्य ठेवण्यासाठी सार्वभौमता, एकता ,अखंडता टिकवण्यासाठी स्वतः प्राण पणाला लावले त्या जवानां मधील नम्रता ,असहिष्णुता हे गुण पुढील पिढीत निर्माण व्हावेत, वृक्षांप्रमाणेच निस्वार्थ सेवाभाव ठेवून पुढची पिढी ने जगावे यासाठी हे अभियान आम्ही २०१४ पासून प्रत्येक वर्षी राबवीत आलो आहोत. आज त्या अभियानांतर्गत साडेचार हजार वृक्षांचे'' शहीद ऑक्सिजन पार्क'' हे उभे राहिले आहे यावर्षीही हे अभियान प्रा मेजर एस .पी .कुलकर्णी हे राबवणार आहेत.

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत बाबींची पूर्तता करण्यासाठी गावपातळीवर विशेष मोहिम

**बीड । प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना सुरु केली आहे. या योजने अंतर्गत सरसकट सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) रु. २०००/- प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी रू. ६०००/- लाभ अदा करण्यात आला आहे.**

लागवडीलायक क्षेत्रधारक, बँक खाती आधार संलग्न व योजनेचे केलेले शेतकरी कुटुंब पी. एम. किसान योजनेच्या लाभासाठी पात्र आहेत. या योजनेच्या लाभासाठी बंधनकारक असलेल्या या तिन्ही बाबींची पूर्तता राज्यातील ९०.२० लाख लाभार्थ्यांनी केलेली आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार दिनांक ०५ जून, २०२४ ते १५ जून, २०२४ या कालावधीत या बंधनकारक बाबींची उर्वरित लाभार्थींनी पूर्तता करण्यासाठी गावपातळीवर विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेमध्ये लाभार्थींची स्वयं नोंदणी व -साठी राज्यातील सर्व सामाईक सुविधा केंद्र तर आधार संलग्न बँक खाती उघडण्यासाठी इंडिया पोस्ट पेमेंट बँक यांनाही सहभागी करण्यात आले आहे. त्यानुसार भूमी अभिलेख नोंदीनुसार ( नुसार) जमिनीचा तपशील अद्ययावत न केलेल्या, बँक खाती आधार संलग्न व ई-केवायसी न केलेल्या लाभार्थींनी सदर बाबींची पूर्तता या विशेष मोहिमेमध्ये करून घ्यावी. यामध्ये भूमी अभिलेख नोंदी अद्ययावत नसलेल्या लाभार्थींनी संबंधित तलाठी / तहसील कार्यालयामध्ये संपर्क साधावा. त्याचप्रमाणे व बँक खाती आधार संलग्न करणे यासाठी अनुक्रमे नजीकच्या सामाईक सुविधा केंद्र व इंडिया पोस्ट पेमेंट बँक च्या मार्फत कार्यपूर्तता करावी.पी.एम.किसान योजनेचा १७ वा हप्त्याचा लाभ जून महिन्याच्या शेवटच्या किंवा जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वितरीत करण्याचे केंद्र शासनाचे नियोजन आहे. या योजनेसाठी नोंदणी करणे, ई-केवायसी करणे, बँक खाती आधार क्रमांकास जोडणे या बाबींची पूर्तता योजनेचा १७ वा हप्ता वितरणापूर्वी राज्यातील सर्व शेतक-यांनी स्वत: करून घेण्याचे आवाहन कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुण्याचे कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) विकास पाटील यांनी केले.

# पर्यावरण दिन:सामाजिक वनीकरण कडून विविध उपक्रम



**परळी । प्रतिनिधी**

**जागतिक पर्यावरण दिनानिमित्त परळी तालुका सामाजिक वनीकरण विभागाकडून परळी शहरातील रेल्वे स्थानक परिसरात वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला.**

५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त परळी वन परिक्षेत्र अधिकारी सामाजिक वनीकरण परळी यांच्या वतीने दक्षिण मध्य रेल्वेच्या परळी रेल्वे स्थानक आणि कर्मचारी निवासी वसाहत भागात वृक्षारोपण आणि सिड बॉल रोपन करण्यात आले.यावेळी परळी रेल्वे स्थानकचे स्टेशन मास्टर, कर्मचारी पांडे, आरपीएफ, एसडीआरएम, सीएसआय चे संपूर्ण स्टाफ सामाजिक वनीकरण विभागाचे वनक्षेत्रपाल जाधवर, सामाजिक वनीकरण वनपाल अनिल मालेवार, जगतकर काळे सामजिक वनीकरण विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.यावेळी पर्यावरण विषयक जन जागृती करून रॅली काढून पर्यावरण वाचवण्याची शपथ घेण्यात आली.



दिंद्रुड : खोलेश्वर विद्यालयाची माजी विद्यार्थिनी सोळंके अनुजा शिवाजी हिने नुकत्याच झालेल्या परीक्षा- २०२४ मध्ये ५८९ मार्क्स मिळवून घवघवीत यश संपादन केले, त्याबद्दल तिचे अभिनंदन व सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देताना संस्थेचे अध्यक्ष मा. दिलीपराव पारेकर, मुख्याध्यापिका श्रीमती फपाळ मॅडम, पारेकर मॅडम व इतर.

# बालविवाह थांबविलेल्या मुलीला इयत्ता दहावीला ९३ टक्के गुण

## जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंढे यांनी केला सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंढे यांच्या अध्यक्षते खाली दि.०६/०६/२०२४ रोजी जिल्हा कृती दलाची बैठक पार पडली. या बैठकीत माहे एप्रिल २०२४ ते माहे मे २०२४ काळातील चाईल्ड हेल्पलाईन बीड, वन स्टोप सेंटर, शक्ती सदन- स्वाधारगृह या कार्यालयांच्या कामकाजाची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुधीर ढाकणे यांनी जिल्हाधिकारी यांना दिली. नंतर चाईल्ड हेल्पलाईन जिल्हा समन्वयक अश्विनी जगताप, बाल कल्याण समिती अध्यक्ष अशोक तांगडे यांनी आपापल्या कार्यालयाचे अहवाल देऊन आपल्या चालू कामकाजाची माहिती बैठकीत मांडली. या वेळी बालविवाह संदर्भात विविध उपाय योजना बाबत जिल्हाधिकारी यांनी विविध विभागाला सूचना दिल्या.**

यावेळी मागील वर्षी जिल्हा प्रशासना मार्फत आंबेजोगाई तालुक्यातील एका मुलीचा बालविवाह थांबविण्यात आला होता, नंतर मुलीच्या पालकांचे समुपदेशन करून मुलीला दहावीची परीक्षा देण्यास प्रवृत्त केले होते. या मुलीला इयता दहावीच्या परीक्षेत ९३% टक्के गुण मिळाले. बालविवाह थांबवून शिक्षणाच्या प्रवाहात आल्यामुळे जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंढे यांनी सदर मुलीचा जिल्हा कृती दल बैठकीत सत्कार केला व तिच्या पालकांचे देखील अभिनंदन केले. तसेच बीड जिल्ह्यातील विविध बालगृहातील मुलांचा दहावीतील परीक्षेत यश मिळवल्या बद्दल जिल्हाधिकारी यांनी सत्कार केला. मागील वर्षात बालविवाह मुक्त मोहिमच्या उत्तम अंमलबजावणी



केल्यामुळे जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंढे यांनी शिक्षण विभाग व बाल कल्याण विभागाचे कौतुक केले. तसेच शिक्षण विभागा मार्फत बालविवाह विरोधी प्रतिज्ञा, पथनाट्य, निबंध स्पर्धा अशे विविध कार्यक्रम या वर्षी देखील राबवून बालविवाहचे दुष्परिणाम लोकांपर्यंत पोहोचवावी जेणे करून चाइल्ड हेल्पलाइन (१०९८) या क्रमांकावर बालविवाह बाबत जास्तीत जास्त माहिती देतील. यावेळी बीड जिल्हा बालविवाह मुक्त मोहीम अंतर्गत जिल्हा कृती दलाचे या वर्षीचे नियोजन देखील करण्यात आली. यावेळी विविध विभागाचे विभाग प्रमुख, युनिसेफ व इतर सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पान ६ वरून...

### महायुतीच्या नेत्यांमधील बेबनाव

सभा घेतली. परंतु डझनभर नेते असतांना गडकरी पेंडॉलमध्ये आले तेव्हा केवळ २०० लोकही नव्हते. त्यामुळे गडकरी यांना माजलगाव मध्ये दोन तास थांबण्याची वेळ आली.यावरून नियोजन ढिसाळ होते हे लक्षात आले.तर दुसरीकडे बजरंग सोनवणें यांनी एकाही सभेचे आयोजन केले नव्हते.त्यांनी माजलगाव शहर व तालुक्यातील सर्वसामान्य तारुणांवर हि निवडणूक सोपवली होती. महायुतीचे काम करणारे नेते सर्वच बाबतीत तगडे व सक्षम असताना केवळ त्यांच्यात असलेल्या बेबनावामुळे भाजपच्या बालेकिल्ल्यात पंकजा मुंडे यांना बजरंग सोनवणे यांच्यापेक्षा माजलगाव तालुक्यात १३,४४४ पेक्षाही कमी मताधिक्य मिळाले.यामुळे पंकजा मुंडे यांच्या विजयाचा मार्ग खडतर बनला. मागील विधानसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांनी येथील भाजपाचे मोहन जगताप यांच्या ऐवजी भाजपा नेते रमेशराव आडसकर यांना उमेदवारी दिली होती.त्यामुळे तेव्हापासून मोहन जगताप नाराज दिसत होते.त्यामुळे ते लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात पाहिजे तेवढे सक्रिय दिसले नाहीत. या निवडणुकीच्या माध्यमातून येथील आमदार प्रकाश सोळंके,रमेश आडसकर,अशोक डक,मोहन जगताप यांनी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीची तयारी केली असलो दिसून आले.

-------------

### शंकी गोगलगाय नियंत्रणासाठी

टाकून माराव्यात किंवा खोल खड्ड्यात पुरुन वरून चुण्याची भुकटी टाकून खड्डा मातीने झाकावा. लहान गोगलगाईच्या नियंत्रणासाठी २० टक्के मिठाच्या द्रावणाची फवारणी करावी, शेत किंवा बागेच्या सभोवती बांधापासून आतल्या बाजूने तंबाखू किंवा चुन्याचा ४ ते ५ इंच पट्टा टाकल्यास गोगलगायींना अटकावा होतो. रासायनिक उपयोजना मेटाल्डिहाईड २.५ टक्के भुकटीचा ५० ते ८० ग्राम १०० स्केअर फुट वापर गोगलगाईच्या मार्गात, पिकाच्या दोन ओळीत किंवा प्रादुर्भाकवत क्षेत्रात केल्यास गोगलगायींचे चांगले नियंत्रण करता येते. गोगलगायीच्या नियंत्रणासाठी विषारी आमिषाचा वापर करता येतो. त्यासाठी गहू किंवा भाताचा भुसा किंवा कोंडा ५० किलो अधिक २५ ग्रॅम ईस्ट गुळाच्या द्रवणात २०० ग्राम गूळ प्रति १०० लिटर पाणी १२ ते १५ तास भिजत ठेवावा. त्यात मिथोमिल ४० एस.पी या कीटकनाशकाची ५० ग्रॅम भुकटी मिसळावी. अशा रितीने तयार केलेले आमिष संध्याकाळच्या वेळी प्रादुर्भावित शेतात पसरवून द्यावे. विषारी आमिष खाऊन मेलेल्या गोगलगायी हातामध्ये रबरी मोजे घालून गोळा कराव्यात. व १ मीटर खोल खड्ड्यात पुरून टाकाव्यात. मिथेमिल हे अत्यंत विषारी कीटकनाशक असल्याने पाळीव प्राणी तसेच भटके प्राणी किंवा पक्षी अमिषांनी मेलेल्या मेलेल्या खाणार नाहीत याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी. शंकीगाईच्या नियंत्रणासाठी एकटया शेतकऱ्यांने प्रयत्न करतात सामूहिकरित्या प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच कृषी विद्यापीठाच्या शिफारशी प्रमाणे उपचाराचा अवलंब करावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

-----------

### हेल्मेट सक्तीच्या नावाखाली

अनेक वेळा हा दंड कसली पावती न देता आकारला जात आहे. या माध्यमातून सर्वसामान्य ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेला लुटण्याचे काम महामार्ग पोलीस करत आहे हा प्रकार पोलीस प्रशासनाने लक्ष केंद्रित करून त्वरित थांबवावा अशी मागणी मांग गारूडी समाजाचे जिल्हाध्यक्ष गोरख काळे सह आदींनी केली आहे.

-----------

### धारूर तालुका क्रीडा प्रशिक्षण

मोठ्या प्रमाणावर उगवली असल्याने खेळाडूंना हे मैदान वापरता येत नाही तसेच खेळाडूंना प्रशिक्षण देण्यासाठी तालुका क्रीडा अधिकारी ही नाही त्यामुळे तालुक्यातील खेळाडूंना मोठ्या अडचणींचा सामोरे जावे लागत आहे तालुक्यातून गुणवान खेळाडू तयार व्हावे यासाठी प्रशासनाने लक्ष देऊन तालुका प्रशिक्षण केंद्र सुरू करावे व मैदानाची दुरुस्ती करून खेळाडूंसाठी मैदान उपलब्ध करावे अशी मागणी तालुक्यातील खेळाडू व क्रीडाप्रेमी यांच्याकडून करण्यात येत आहे. सुसज्ज क्रीडा प्रशिक्षण केंद्र व अद्यावत मैदान खेळाडूंसाठी उपलब्ध करावे अशी मागणी खेळाडूंमधून केली जात आहे.

---------------

### खते, बियाणे,औषधी संबंधित काही

सरळ खतांपासून तयार करणे शक्य आहे. तेव्हा पुनश्च आवाहन कोणत्याही विशिष्ट बियाण्याचे वाण उत्पादक अथवा खतांचे विशिष्ट कंपनीचे विशिष्ट ग्रेड यांचा आग्रह ठेवू नये. अशी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

-----------

### पनामा कंपनीची पवनचक्की

वेळेस ही पवन चक्की खाली कोसळली त्यावेळेस तिथे कोणी नव्हते त्यामुळे मोठी जीवित हानी टळली. अचानक घडलेल्या घटनेमुळे परिसरातील नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

cmyk

# कांद्याला झळाळी! दरात झाली वाढ, कोणत्या बाजारात किती दर?

कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारी बातमी आहे. सध्या कांद्याच्या दरात वाढ होताना दिसत आहे. अनेक बाजारपेठेत कांद्याची आवक कमी झाल्यानं दरात वाढ झाली आहे. काल (५ जून रोजी) सोलापुरात कांद्याला विक्रमी दर मिळाला. सोलापुरात कांद्याची घाऊक किंमत ३३ रुपये प्रति किलोवर पोहोचली आहे. केंद्र सरकारनं कांद्याच्या निर्यातीवरील बंदी उठवली आहे. मात्र, बंदी उठवताना काही अटी आणि शर्ती घातल्या होत्या. त्यामुळं कांद्याचे दर कमीच होते. मात्र, बऱ्याच दिवसानंत आता कांद्याच्या दरात वाढ होताना दिसत आहे. अनेक बाजारपेठेत कांद्याची आवक कमी झाली आहे. याचा परिणाम कांद्याच्या दरावर दिसून आला आहे. अनेक ठिकाणी कांद्याच्या दरात चांगली वाढ झालीय. सध्या शेतकऱ्यांकडे कांदा आहे, त्या शेतकऱ्यांना चांगला फायदा मिळत आहे.



आवक कमी झाल्यानं कांद्याच्या दरात वाढ

मिळालेल्या माहितीनुसार काही बाजारात कांद्याची किमान घाऊक किंमत २० रुपये किलोच्या पुढे गेली आहे. महाराष्ट्र कृषी पणन मंडळाच्या म्हणण्यानुसार, ५ जून रोजी राज्यातील ४३ पैकी ४० बाजार समित्यांमध्ये कांद्याची कमाल घाऊक किंमत २० रुपये प्रति किलोच्या वर होती. दरम्यान, नुकत्याचा झालेल्या लोकसभा निवडणुकीत कांद्यानं मोठं मार्केट खाल्ले आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या नाराजीचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. केंद्र सरकारने ४ मे रोजी कांदा निर्यातबंदी पाच महिन्यांनी संपवण्याचा निर्णय घेतला होता. तेव्हा बाजारात कांद्याचे भाव खूपच कमी होते. आता कांद्याची निर्यात होऊ लागली आहे, त्यामुळे स्थानिक बाजारपेठेतील आवक लक्षणीय घटली आहे. आता आवक कमी झाल्याने भाव वाढत आहेत.

## पावसाळ्यात शेळ्यांचे व्यवस्थापन



राज्यासह देशभरात अनेक शेतकरी हे शेळीपालन करतात. शेळीपालन व्यवस्थापनात सर्वांत जास्त काळजी ही गोठ्यात असणारी आर्द्रता कमी करण्यासाठी घ्यावी लागते. शेळ्यांना आर्द्रता सहन होत नाही, त्यामुळे त्यांना श्वसनसंस्थेचे रोग होण्याची दाट शक्यता असते. पावसाळ्यात आद्रतेचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे पावसाळ्यात शेळ्यांच्या व्यवस्थापनात त्यानुसार बदल करणे गरजेचे आहे. ज्यामुळे शेळीपालनातील आर्थिक नुकसान कमी करण्यास मदत होते.

जंतुनाशक औषधे द्यावीत : शेळीच्या शरीरावर कोणत्याही प्रकारचा ताण वाढणार नाही, याची काळजी घ्यावी लागते. कळपातील सर्व शेळ्यांना जंतुनाशक औषधे द्यावीत. त्यामुळे कळप जंतमुक्त राहू शकतात. अशावेळी शेळ्यांच्या अंगावर गोचीड होतात. त्यामुळे शेळ्यांना रोग होतात गोचीड शेळ्यांच्या शरीरातील रक्त शोषतात. त्यामुळे शेळ्या अशक्त होतात. अंगावर खाज सुटते, त्यामुळे शेळ्या बैचेन होतात, खाणे बंद करतात, हालचाल मंदावते यावर उपाय म्हणून शेळ्यांच्या अंगावर गोचीड प्रतिबंधक औषध लावावे किंवा गोठा धुऊन घ्यावा. ज्यामुळे शेळ्यांना होणाऱ्या आजारांपासून वाचवण्यास मदत होणार आहे.

आर्द्रता कमी ठेवण्यासाठी करा 'हे' उपाय : शेळ्यांना आर्द्रता अजिबात सहन होत नाही, त्या उष्णता सहन करू शकतात. गोठ्यातील आद्रता कमी ठेवण्यासाठी गोठ्यात रात्रीच्या वेळी शेगडी लावावी अथवा ६० वॉटचा विजेचा बल्ब रात्रभर लावून ठेवावा. गोठ्यातील मलमूत्र रोजच्या रोज साफ करून गोठा कोरडा ठेवावा गोठ्यातील जमीन जर ओली असेल तर शेळ्यांच्या पायाच्या खुरामध्ये ओलसर पणा राहून पायाला फोड येतात, यामुळे शेळ्या लंगडतात, ताप येतो, चारा कमी खाते अशक्त होतात.

पावसाळ्याच्या दिवसात शेळ्यांना बाहेर सोडू नये. पावसात जास्त वेळ शेळी भिजली की न्यूमोनियासारखा आजार होतो. यामुळे शेळी शिंकते, नाकातून चिकट पांढरा पिवळसर द्रव वाहतो, ताप येतो, धाप लागते. कोवळ्या चाऱ्यामध्ये तंतुमय पदार्थ कमी असतात, जास्त प्रमाणात हा चारा खाल्यामुळे शेळ्यांना अपचन होते. पोटफुगी, हगवणीसारखे आजार होतात. पोटफुगी होऊ नये यासाठी गोडे तेल आणि खाण्याचा सोडा पाजला तर पोटफुगी कमी होते.

## वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाने खरीप पेरणीसाठी वाणांची केली शिफारस

परभणी : वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाने खरीप पेरणीसाठी तूर, मूग, भुईमुग, उडीद, मका पिकांच्या वेगवेगळ्या वाणांची शिफारस केलेली आहे. राज्यात खरीप हंगाम तोंडावर आला आहे. मराठवाड्यात पूर्व मशागतीचा शेवटचा टप्पा संपत आला असून, शेतकरी खरीप पिकांच्या वेगवेगळ्या बियाण्यांची जमवाजमव करत आहेत. दरम्यान, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाने खरीप पिकांच्या या वाणांची शिफारस केली आहे.

कापूस : कापूस पिकाच्या लागवडीसाठी वाण निवडताना जमीन व हवामान, कोरडवाहू किंवा बागायती, लागवडीचा प्रकार व वाणांचे गुणधर्म



यांचा विचार करून वाणांची निवड करावी.

तूर : पिकाच्या पेरणीसाठी बीडीएन-२०१३-४१(गोदावरी), बीडीएन-७११, बीएसएमआर-७३६, बीएसएमआर-८५३ (वैशाली), बीडीएन-७१६, बीडीएन-२, बीडीएन-७०८ (अमोल), एकेटी ८८११, पीकेव्ही तारा किंवा आयसीपीएल ८७११९ इत्यादी वाणांचा वापर करावा. मूग : पेरणीसाठी कोपरगाव, बीएम-४, बीपीएमआर-१४५, बीएम-२००२-१, बीएम-२००३-२, फुले मुग २, पी.के.व्ही.ए.के.एम ४ इत्यादी वाणांचा वापर करावा.उडीद : लागवडीसाठी बीडीयू-१, टीएयू-१, टीपीयू-४ इत्यादी वाणांचा वापर करावा.


भुईमूग : पिकाच्या लागवडीसाठी एसबी-११, जेएल-२४, एलजीएन-२ (मांजरा), टीएजी-२४, टीजी-२६, टीएलजी-४५, एलजीएन-१, एलजीएन-१२३ इत्यादी वाणांचा वापर करावा.

मका : पिकाच्या पेरणीसाठी नवज्योत, मांजरा, डीएमएच-१०७, केएच-९४५१, एमएचएच, प्रभात, करवीर, जेके-२४९२, महाराजा, युवराज इत्यादी वाणांचा वापर करावा.

## महात्मा फुले कृषी विद्यापीठाने तुरीचे फुले पल्लवी नवीन वाण केले विकसीत

तुरीचा नवीन वाण महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कडधान्य सुधार प्रकल्पाने विकसित केलेला आहे. फुले पल्लवी' असे या वाणाचे नाव असून अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प खरीप कडधान्य, कानपूर द्वारे या वाणास मान्य करण्यात आले आहे. १५५ ते १६० दिवसांच्या मध्यम पक्वता कालावधी असलेला हा वाण देशातील मध्य भाग जसे महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात आणि राजस्थान या राज्यांमध्ये लागवडीसाठी शिफारस करण्यात आली आहे.

'फुले पल्लवी' या नवीन तूर वाणाच्या आगमनाने, शेतकऱ्यांना अधिक उत्पादन आणि चांगल्या प्रतिचे तूर उत्पादन मिळवण्यास मदत होईल. तसेच, रोग आणि किडींपासून होणाऱ्या



नुकसानीपासूनही संरक्षण मिळेल. 'फुले पल्लवी' या नवीन तूर वाणाच्या आगमनाने, शेतकर्यांना अधिक उत्पादन आणि चांगल्या प्रतिचे तूर उत्पादन मिळवण्यास मदत होईल. तसेच, रोग आणि किडींपासून होणाऱ्या नुकसानीपासूनही संरक्षण मिळेल. 'फुले पल्लवी' (फुले तूर १२-१९-२) हा वाण विकसित करण्यात डॉ. एन.एस. कुटे (पीक उत्पादन तज्ञ आणि प्रमुख शास्त्रज्ञ), डॉ. व्ही.एम. कुलकर्णी (वरिष्ठ संशोधन सहाय्यक), डॉ. व्ही.ए. चव्हाण (तूर रोगशास्त्रज्ञ) आणि डॉ. सी.बी. वायळ (तूर किटकशास्त्रज्ञ) यांच्यासह अनेक शास्त्रज्ञांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील आणि संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली हे संशोधन पूर्ण झाले.

उत्पादकता आणि रोगप्रतिकारशक्ती जास्त : 'फुले पल्लवी' या वाणाची सरासरी उत्पादकता प्रति हेक्टरी २१.४५ क्विंटल इतकी आहे. या वाणाचे दाणे टपोरी आणि फिकट तपकिरी रंगाचे असून, १०० दाण्यांचे वजन ११.० ग्रॅम आहे. मर आणि वांझ या तूर पिकातील प्रमुख रोगांना हा वाण मध्यम प्रतिकारक आहे. शेंगा पोखरणारी अळी आणि शेंगमाशी या किडींपासूनही या वाणाला कमी धोका आहे.

## फणस शेतीतून चांगला नफा, आता राज्यात सगळीकडेच लागवड

भारतातील बहुतेक शेतकरी पारंपारिक शेती सोडून अपारंपारिक शेतीकडे जाण्यास प्राधान्य देत असून त्यात यशस्वी देखील होत आहेत. याशिवाय शेतकऱ्यांना त्यातून चांगले उत्पन्न देखील मिळवत आहेत. कमी वेळेत अधिक नफा मिळविण्यासाठी देशातील शेतकरी भाजीपाला लागवडीला प्राधान्य देतात. यामध्ये फणस लागवडीचाही समावेश असून, त्याची लागवड करून शेतकरी कमी वेळात चांगले उत्पन्न मिळवू शकतात. फणसमध्ये अनेक प्रकारचे पौष्टिक घटक आढळतात. जे शरीरासाठी खूप फायदेशीर मानले जातात.

फणसाच्या झाडाची उंची ८ ते १५ मीटर असून, वसंत ऋतूपासून फळधारणा सुरू होते आणि पावसाळ्यापर्यंत फळे येतात. त्याचे झाड आकाराने लहान व मध्यम असून ते बरेच पसरलेले आहे. फणसाची भाजी देखील केली जाते, जी सर्वोत्तम भाजी मानली जाते. शेतकऱ्यांना वर्षभरात ८० ते ९० फळे मिळतात. या झाडापासून मिळणाऱ्या फळाचा रंग गडद हिरवा असून, त्याचा आकार गोल असतो. फणसाच्या बियांचा भाग मऊ असल्यामुळे त्याची फळे पिकण्यास जास्त वेळ लागतो.

योग्य माती आणि हवामान :

शेतकरी कोणत्याही प्रकारच्या जमिनीत



फणसाची लागवड करू शकतात. परंतु वालुकामय व चिकणमाती जमीन त्यासाठी योग्य मानली जाते. हे एक उष्णकटिबंधीय फळ आहे. कारण ते आर्द्र आणि कोरड्या दोन्ही हवामानात तयार केले जाऊ शकते. फणस लागवडीला जास्त पाणी लागत नाही. याच्या पिकाला जास्त सिंचनाची गरज नसते, जास्त पाणी दिल्याने त्याचे पीकही नष्ट होऊ शकते. त्याची मुळे पाणी शोषण्यास सक्षम नसतात, म्हणून शेतकऱ्यांना त्याच्या शेतात पाण्याचा निचरा योग्य प्रकारे करावा लागतो.

सुधारित फणस जाती : रसाळ, खाजवा, सिंगापूर, गुलाबी, रुद्राक्षी.

फणसाचे रोप कसे लावायचे ?: या वनस्पतीची लागवड करण्यापूर्वी तुम्हाला पिकलेल्या फणसातून बिया काढाव्या लागतील. पेरणीसाठी सुपीक मातीची निवड करावी लागते. पेरणीपूर्वी सेंद्रिय खत आणि इतर खते जमिनीत चांगली मिसळावी लागतात, जेणेकरून त्याची योग्य मशागत करता येईल. पेरणीनंतर लगेच पाण्याची फवारणी करावी लागते. पेरणीनंतर रोपाची १ वर्ष काळजी घ्यावी लागते.

खत व्यवस्थापन : फणसच्या झाडाला दरवर्षी फळे येतात. त्यामुळे झाडाची सुपीकता व उत्पादकता चांगली राहण्यासाठी वेळोवेळी खताचा वापर करावा लागतो. शेतकरी त्यांच्या शेतात शेणखत, युरिया, पोटॅश आणि फॉस्फरस यांसारखी खते टाकू शकतात. झाडाचा आकार जसजसा वाढतो तसतसे त्याचे खतही वाढवावे लागते. या झाडाला खत घालण्यासाठी एक खड्डा तयार केला जातो ज्यामध्ये खत टाकले जाते.

कीटक आणि रोग : फणस पिकावर कीड व रोग येण्याचे मुख्य कारण म्हणजे वेळेवर खत न देणे आणि कमी पाणी देणे. याशिवाय फणसाच्या शेतातील ओलावा हे देखील रोगाचे प्रमुख कारण असू शकते. अनेक वेळा पिकाला जास्त सिंचन आणि अतिवृष्टीमुळे शेतात ओलावा निर्माण होतो, ज्यामुळे पिकाच्या उत्पादकतेवर परिणाम होतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५३९ : बक्सर च्या जवळ चौसा या ठिकाणी अफगाण शासक शेरशाह सुरी आणि मुघल शासक बादशाहा हुमायू यांच्यात झालेल्या लढाईत बादशाहा हुमायू यांचा पराभव झाला.
१८९३ : महात्मा गांधीं यांनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली.
१९३८ : डी. सी. ४ प्रकारच्या विमानाचे प्रथम उड्डाण.
१९६५ : अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने परिणित दांपत्याने गर्भनिरोधक साधने वापरणे कायदेशीर ठरवले.
१९७५ : क्रिकेटच्या पहिल्या विश्वकरंडक स्पर्धेस इंग्लंडमध्ये सुरुवात झाली.
१९७९ : रशियातील कापुस्तिनयार येथून भास्कर-१ उपग्रहाचे प्रक्षेपण.
१९८१ : इस्त्रायलने इराकची ओसिराक परमाणू भट्टी नष्ट केली.
१९८५ : विम्बल्डन पुरुष एकेरीचे विजेतेपद १७ व्या वर्षी मिळवणारा बोरिस बेकर हा सर्वात तरुण खेळाडू बनला.
१९९१ : फिलिपाइन्स मधल्या माउंट पिनाटुबो ज्वालामुखीचा उद्रेक.
१९९३ : महात्मा गांधीं यांनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली.
१९९४ : आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या उपव्यवस्थापकीय संचालकपदी अर्थतज्ज्ञ प्रभाकर नार्वेकर या प्रथमच एका भारतीयाची नियुक्ती झाली.
२००१ : युनायटेड किंग्डम मधील निवडणुकांत टोनी ब्लेरच्या नेतृत्वाखाली लेबर पार्टीला मोठे बहुमत.
२००४ : शिरोमणी अकाली दल (लाँगोवाल) या राजकीय पक्षाची स्थापना.
२००६ : अल कायदाचा इराकमधील म्होरक्या अबू मुसाब अल झरकावी हा अमेरिकन हवाईदलाने केलेल्या बॉम्बहल्ल्यात ठार झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३७ : अलोइस हिटलर, एडॉल्फ हिटलरचे वडील.
१९१३ : लेखक टीकाकार मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष यांचा जन्म. (मृत्यू: १९ एप्रिल २०१०)
१९१४ : दिग्दर्शक, पटकथाकार, लेखक व पत्रकार ख्वाजा अहमद तथा के. ए. अब्बास यांचा जन्म. (मृत्यू: १ जुन १९८७)
१९१७ : अमेरिकन गायक, संगीतकार निर्माते डीन मार्टिन यांचा जन्म. (मृत्यू: २५ डिसेंबर १९९५)
१९४२ : लिबियाचा हुकूमशहा मुअम्मर गडाफी यांचा जन्म. (मृत्यू: २० ऑक्टोबर २०११)
१९४९ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश सुरिंदरसिंग निज्जर यांचा जन्मदिन
१९५७ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त सरन्यायाधीश व भारतीय सशस्त्र सैन्य न्यायाधिकरणाचे विद्यमान अध्यक्ष न्यायमूर्ती राजेंद्र मेनन यांचा जन्मदिन.
१९५९ : भारतीय अर्थशास्त्रज्ञ आणि भारत सरकारचे माजी मुख्य आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रमण्यम यांचा जन्मदिन.
१९७४ : महेश भूपती, भारतीय टेनिसपटू.
१९७५ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित सुप्रसिद्ध भारतीय चित्रपट व टेलीव्हिजन मालिका निर्माता आणि दिग्दर्शिका एकता कपूर यांचा जन्मदिन.
१९८१ : अमृता राव, मराठी चित्रपट अभिनेत्री.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२१ : रोमेनियाचे क्रांतिकारी ट्युडोर व्लादिमिरेस्कु यांचे निधन.
१९५४ : ब्रिटीश गणितज्ञ आणि संगणकशास्त्रज्ञ ऍलन ट्युरिंग यांचे निधन. (जन्म: २३ जुन १९१२)
१९७० : ब्रिटिश साहित्यिक इ. एम. फोर्स्टर यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १८७९)
१९७८ : रोनाल्ड जॉर्ज व्रेफोर्ड नॉरिश (चित्रित), ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता.
१९९२ : डॉ. स. ग. मालशे, मराठी वाङ्मयाचे अभ्यासक आणि संशोधक.
१९९२ : नासकार चे सहसंस्थापक बिल फ्रान्स सीनियर यांचे निधन. (जन्म: २६ सप्टेंबर १९०९)
१९९८ : शशिकांत नार्वेकर, गोमंतक मराठी अकादमीचे अध्यक्ष.
२००० : बालसाहित्यिक गोपीनाथ तळवलकर यांचे निधन. (जन्म: २९ नोव्हेंबर १९०७)
२००२ : बी. डी. जत्ती, भारतीय उपराष्ट्रपती.
२०२० : चिरंजीवी सर्जा (भारतीय कन्नड चित्रपट अभिनेते, जन्म: १ ऑक्टोबर १९८४).

## शेतकरी बंधुंनो पावसाळ्यात विजेच्या बचावापासून अशी घ्या खबरदारी



पावसाळ्याची सुरुवात ही नेहमीच वादळी वारा आणि विजेच्या कडकडाटासह असते. अशावेळी वीज पडून शेतकऱ्यांचे आणि जनावरांचे नुकसान होते. बरेचदा मृत्युमुखी पडण्याचीही भीती असते. वीज पडू नये हे जरी आपल्या हातात नसले तरी अशा परिस्थितीत काय काळजी घेता येईल आणि सावधगिरी कशी बाळगता येईल याबद्दल माहिती असायला हवी.

कशी खबरदारी घ्यावी? : मेघ गर्जना, विजांचा कडकडाट व जोरदार वाऱ्याची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या फळबागांना तसेच भाजीपाला पिकांना जोरदार वाऱ्यामुळे झाडे पडू नये म्हणून काठी/बांबूच्या सहाय्याने आधार द्यावा. शेतामध्ये काम करत असल्यास त्वरित सुरक्षित ठिकाणी जावे. झाडाखाली थांबणे टाळावे. जनावरे तलाव, नदी किंवा इतर पाण्याच्या ठिकाणी असतील तर त्यांना त्वरित बाहेर काढून सुरक्षित ठिकाणी आणावे. जनावरे ट्रॅक्टर किंवा इतर धातुंच्या वस्तूंपासून लांब बांधावीत. वाहने झाडाखाली उभी करू नयेत. काढणी केलेला शेतमाल प्लास्टिकच्या कागदाने झाकावा. विद्युत उपकरणे, विद्युत तारा यांचा संपर्क टाळावा. जनावरांना झाडाखाली जमा होऊ देऊ नये. मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ. च्या अंदाजासाठी 'दामिनी' अँड्रॉइड ॲप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.

# शरद पवारांच्या सभेने सोनवणेंचा विजय झाला पक्का

## पंकजा मुंडेना हाय प्रोफाईल राजकारण भोवले, मराठा समाजाची मते दुर गेल्याने पराभव

नागनाथ वारद

अंबाजोगाई : बीड लोकसभा मतदार संघात भाजपने पंकजा मुंडे यांना उमेदवारी दिली पण मराठा समाजाची मते दुर गेल्याने पंकजा मुंडे या पराभूत झाल्या आणि भाजपला मोठा झटका बसला. जवळपास २००९ पासून बीड लोकसभा मतदार संघांत भाजपची सत्ता होती. ही जागा बजरंग सोनवणे यांनी निवडून येऊन काबीज केली. केज विधानसभा मतदारसंघात पंकजा मुंडे यांना जवळपास एक लाख ९३६० इतकी मते मिळाली आणि बजरंग सोनवणे यांना एक लाख वीस हजार १५८ एवढी मते मिळाली म्हणजे सोनवणे यांना १३००० मताचे मोठे मताधिक्य मिळाले. विशेष म्हणजे या ठिकाणी भाजपचे प्रतिनिधित्व नमिता मुंदडा करीत आहेत तरीही सर्वाधिक मताधिक्य महाविकास आघाडीच्या बजरंग सोनवणे यांना आहे मुंदडा यांना अपेक्षेप्रमाणे पंकजा मुंडे यांना मताधिक्य देता आले नाही. अंबाजोगाईत पंतप्रधान नरेंद्र मोदींची सभा झाल्यानंतर बजरंग सोनवणे यांच्यासाठी शरद पवार यांची सभा शहरातच घेण्यात आली. यामुळे मोदींच्या सभेचा पंकजा




मुंडे यांना फायदा झाला नाही. उलट पवारांच्या सभेचा बजरंग सोनवणेंना फायदा झाला.

प्रधान मंत्री मोदी यांनी अंबाजोगाईत सभा घेतली या सभेचा फारसा परिणाम भाजपाला झाला नाही या उलट त्यांच्या भाषणामुळे मुस्लिम समाज दुरावला गेला याची चर्चा केज मतदार संघात दिसून येत होती आणि मतदानातून ते प्रत्यक्ष दिसून आले. केज मतदार संघात अंबाजोगाई शहर घाटनांदुर, पुस, बनसारोळा ही गावे साधारणतः मोठी आहेत.विशेष म्हणजे अनेक कुटुंबे ही व्यवसायासाठी पुणे, छत्रपती संभाजीनगर अशा मोठ्या शहरात आहेत. यावेळी या ही मतदारात निरुत्साह दिसून आला. मुंडे यांच्या प्रचारासाठी रामदास आठवले,भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उदयनराजे भोसले आदींच्या सभा झाल्या. त्याचा फारसा फरक पडला नाही तर महाविकास आघाडी कडून बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ शरद पवार यांनी अंबाजोगाई व बीडमध्ये एक एक सभा घेतली आणि अंबाजोगाईत एक रात्र मुक्काम करून मॅजिक फिगर जुळविले , प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील,खा.अमोल कोल्हे,काँग्रेसच्या खा. रजनी पाटील यांच्या सभा झाल्या. बजरंग सोनवणे यांच्यासाठी अंबाजोगाई शहर व परिसरात माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी परिश्रम घेतले आणि ते किंगमेकर च्या भूमिकेत राहिले याचा त्यांना पुढील काळात फायदा होणार असल्याचे बोलल्या जात आहे. शिवाय रा.काँ.शरदचंद्र पवार गटाच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी तसेच कार्यकर्त्यांनी आणि जनतेने ही निवडणूक प्रत्यक्ष हातात घेऊन यशस्वी केली. भाजपा सरकारने महागाई,बेरोजगारी आणि मराठा आरक्षणाचा प्रश्न आणि फोडाफोडी त्याचा मोठा फटका भाजपला म्हणजेच पंकजा मुंडे यांना बसला. विशेष म्हणजे विकासाच्या मुद्द्यावर न बोलता वैयक्तिक उणीदुणी काढण्यावर भर दिसून आला. पंकजा मुंडे यांना वेळोवेळी मराठा समाजाच्या आक्रोशाला सामोरे जावे लागले होते बजरंग सोनवणे यांना मराठा समाजाने भरभरून मतदान केल्याचे चित्र दिसत आहे जरांगे फॅक्टर मोठया प्रमाणात चालला. मुस्लिम आणि दलित यांना भाजपाने वाऱ्यावर सोडले असे देखील सोशल मिडिया मधून वारंवार दिसून येत होते म्हणूनच या मतदारांनीही एक गठ्ठा मतदान बजरंग सोनवणे यांच्या पारड्यात टाकून पंकजा मुंडे यांच्या बद्दलचा आणि पंतप्रधान मोदी यांच्या वक्तव्याचा रोष व्यक्त केला.

खुद्द उमेदवार पंकजा मुंडे यांनी ही निवडणूक सुरुवातीस हलक्यात घेतली त्यामुळे भाजपचे कार्यकर्ते हे हवेतच राहिले आपला विजय पक्काच आहे म्हणून त्यांनी फारसे काम न करता शेवटच्या क्षणासाठी काम केले आणि जनतेच्या सेवेची संधी हुकवली किंवा मंत्रिपदाची संधीही कार्यकर्त्यांनी पंकजा मुंडे यांना मिळू दिली नाही पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे राजकीय डावपेच देखील बहाद्दर मतदारांनी हाणून पाडले आणि बजरंग सोनवणे यांना मताधिक्य देऊन त्यांच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. अखेर पंकजा मुंडे यांना सातहजार मतांचा निसटता पराभव स्वीकारावा लागला लोकसभा निवडणुकीत दोन वेळा डॉ.प्रितम मुंडे यांनी विजय प्राप्त केला पण पंकजा मुंडे यांना पहिल्याच निवडणुकीत पराभव पत्करावा लागला. प्रामुख्याने त्या वीस वर्षापासून राजकारणात सक्रिय असताना सर्वसामान्य माणसात त्या कधीच आल्या नाहीत काही मोजकीच मंडळी त्यांच्याजवळ होत ते म्हणतील तेच खरे अशा पद्धतीचे प्रशासन चालविले. खा.डॉ.प्रितम मुंडे यांनी देखील बीड लोकसभा मतदारसंघात दहा वर्षे अकार्यक्षम कारभार केल्याचे सोशल मीडिया वर गावागावातून अनेक मतदारांनी सांगितले. विशेष म्हणजे जातीय समीकरणामुळे त्यांनाही निवडणूक भारी पडली राष्ट्रीय स्तरावर नेतृत्व करत असताना स्व. गोपीनाथ मुंडे यांनी अठरा पगड जाती धर्माला सोबत घेऊन आपल्या नावाचा दबदबा निर्माण केला होता. आता पुढे परिवारातून पंकजा मुंडे आणि डॉ.प्रितम मुंडे यांच्या हाय प्रोफाईल राजकारणामुळे त्यांचे राजकीय अस्तित्व पुढील काळात धोक्यात येईल का काय? अशीही चर्चा होताना दिसून आहे.


## थोडक्यात

### कृषी सेवा केंद्र चालकाकडून शेतकऱ्यांची लुट थांबवा-बजगुडे



बीड : बीड जिल्ह्यात वरुण राज्याच्या आगमनानंतर शेतकरी बी बियाणे खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात बाजारपेठेत धाव घेत असताना कृषी सेवा केंद्र चालकाकडून बी बियाणे उपलब्ध असताना देखील जाणीवपूर्वक कृत्रिम टंचाई निर्माण करुन मोठ्या प्रमाणात बियाणांचा काळा बाजार केला जात आहे. बियाणांचा साठा मोठ्या प्रमाणात असताना देखील टंचाई निर्माण करायची व तेच बियाणे शेतकऱ्यांना जास्तीच्या दराने विक्री करण्याचा प्रकार बीड मध्ये सररास होत असुन कृषी अधिकाऱ्यानी याकडे डोळझाक नकरता शेतकऱ्यांची होणारी फसवणुक थांबवुन साठेबाज कृषी सेवा केंद्राची गोडवून तपासणी करावी त्याच बरोबर त्यांच्याकडे किती माल आलेला आहे व त्यांनी किती व कोणाला विक्री केलेला आहे याची तपासणी करावी दोषी व्यापाऱ्यांवर तत्काळ कारवाई करून शेतकऱ्यांना मागेल ते बियाणे योग्य दरात उपलब्ध करून देण्याचे आवाहन बीड तालुका काँग्रेसचे अध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी केले आहे.

### देविदास बरकसे यांचे निधन



गेवराई : जुन्या काळातील करडी तेलाचे व्यापारी तथा प्रा. राजेंद्र बरकसे यांचे मोठे बंधू देविदास रंगनाथराव बरकसे यांचे बुधवार दि . ५ जून २०२४ रोजी सकाळी ११ वाजता अल्पशा आजाराने छत्रपती संभाजीनगर येथे रुग्णालयात निधन झाले . मृत्यूसमयी त्यांचे वय ७० वर्ष होते . त्यांच्या पश्चात पत्नी ,भाऊ, बहिण, नातवंडे असा मोठा परिवार आहे . कै . देविदास बरकसे यांचा अंत्यविधी गेवराई येथील चिंतामणी स्मशान भूमीत सायं ५ वाजता करण्यात आला . यावेळी अंत्ययात्रेत सर्व स्तरातील मान्यवर व नातेवाईक उपस्थित होते . देविदास बरकसे यांच्या निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे .

# पंकजा मुंडेंचा पुढील आठवड्यात आभार दौरा

## सर्व तालुक्यात जावून घेणार मतदारांची भेट

परळी । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केले, अथक परिश्रम घेतले, कुठल्याही गोष्टीची अपेक्षा न ठेवता काम केले त्या सर्वाचे भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी मनापासुन आभार मानले आहेत. पुढील आठवड्यात म्हणजे १२ किंवा १५ तारखेपासून आपण पूर्ण जिल्हाभरात आभार दौरा करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. सर्वच्या सर्व अकराही तालुक्यात जावून मतदारांची भेट घेऊन त्यांचे आभार मानणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात सोशल मिडियावर एका व्हिडिओ संदेशाद्वारे पंकजाताई मुंडे यांनी आपल्या भावना व्यक्त करत मतदारांचे आभार मानले. त्या म्हणाल्या, माझ्यावर प्रेम करणाऱ्या महाराष्ट्रातील समस्त कार्यकर्त्यांचे खूप खूप आभार. ज्या ज्या ठिकाणाहून तुम्ही माझ्यासाठी प्रयत्न केले, प्रार्थना केल्या, माझ्यासाठी नवस बोलले, माझ्या यशाची कामना केली त्याबद्दल सर्वांचे आभार आणि त्या ६ लाख ७७ हजार मतदारांचेही मनापासुन आभार ज्यांनी अत्यंत कठीण परिस्थितीत मला मतदान केलं. या देशामध्ये सर्वात कमी मतांनी निवडून आलेली जागा बीडची असेल आणि सर्वात कमी मतांनी पडलेली पहिल्या अथवा दुसऱ्या नंबरची माझी जागा असेल, म्हणजे इतकी टफ फाईट अत्यंत विपरित परिस्थितीत मी देऊ शकले ते केवळ आणि केवळ तुमच्या सर्वांच्या जीवावर..

मी लवकरच येत आहे, तुम्हाला भेटायला

पक्षाच्या बैठका असल्याने मी मुंबई, दिल्लीला जाईल, त्यानंतर मी १२ किंवा १५ तारखेपासून आभार दौरा करणार आहे. तुमच्या सर्वांपर्यंत मी येणार आहे. तुमचे आभार मानण्यासाठी आणि तुमचे आशीर्वाद घेण्यासाठी! संघर्ष हा आपल्या



जीवनात पाचवीला पूजला आहे. या संघर्षात न घाबरता आपण जो लढा दिला त्याबद्दल आपल्या सर्वांचा मला खूप खूप अभिमान वाटतो असंही पंकजाताई मुंडे यांनी म्हटलं आहे.

# वादग्रस्त फौजदार खोडेवाडसह पेताड पोलिसावर गुन्हे दाखल करा

## पीडित महिलेचे दिंद्रुड पोलिस ठाण्यासमोर अमरण उपोषण

माजलगाव । प्रतिनिधी

न्याय मागण्यासाठी दिंद्रुड ठाण्यात गेलेल्या महिलांच्या अंगाशी झोंबा झोंबी करून मुलांना विनाकारण अमानुष मारहाण करणाऱ्या फौजदार अण्णाराव पांडुरंग खोडेवाड सह पोलीस शिपाई साळुंखे, शेळके यांच्यावर गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी पीडित महिला सह त्यांचे कुटुंबीय आज पासून दिंद्रुड पोलिस ठाण्यासमोर आमरण उपोषणास बसत आहेत. अडचणीत आलेल्या जनतेचे संरक्षण करून त्यांना न्याय देणे हे पोलिसांचे आद्य कर्तव्य असताना अनेकदा पोलीस त्यांचे कर्तव्य विसरतात. सनदशीर मार्गाने न्याय मागण्यासाठी दिंद्रुड पोलीस ठाण्यात गेलेल्या महिलांच्या अंगाशी झुंबाझुंबी करून विनयभंग केला.

सर्वसाधारणपणे वर्मा शिंदे वराडी शिंदे अशी एक म्हण प्रचलित असून याचा तंतोतंत प्रत्यय दिंद्रुड ठाण्यातील कारभाराबाबत दिसून आला. लोणगाव येथे वास्तव करत असलेल्या भारत हजारे यांचे कौटुंबिक वादातून त्यांच्या भावासोबत वाद झाल्यानंतर दिनांक ११ मे रोजी ठाण्यात त्यांनी एनसी दाखल केली होती त्यानंतर २३ मे रोजी साडेअकराच्या दरम्यान दिंद्रुड ठाण्यातील पोलीस शिपाई साळुंखे व शेळके नशेच्या धुंदित यांच्या लोणगाव येथील घरी जाऊन तुम्ही आत्ताच आमच्या सोबत चला असा आग्रह धरला परंतु एकतर मध्यरात्र व त्यात हे दोघेही पोलीस कर्मचारी नशेच्या धुंदीत असल्यामुळे त्यांनी त्यांच्यासोबत जाण्यास स्पष्ट नकार दिला व दुसऱ्या दिवशी ठाण्यात येतो असे म्हटले त्यानुसार भारत हजारे आपल्या पत्नी व तिन्ही मुलासोबत ठाण्यात गेले असता ठाण्याच्या व्हरांड्यात जाताच तीनही मुलांना विनाकारण अमानुष मारहाण केली व नंतर कॅमेरा नसलेल्या खोलीत नेऊन पायातील बुटासह तुडवित जोरात मारहाण करत असल्याने ओरडण्याचा आवाज आल्याने आशा हजारे आत गेल्या असता फौजदार अण्णाराव पांडुरंग खोडेवाड यांनी महिलांच्या अंगाशी झोंबाझोंबी करून विनयभंग केला. या प्रकरणी फौजदार अण्णाराव पांडुरंग खोडेवाड सह नशेबाज पोलीस शिपाई साळुंखे, शेळके यांच्यावर कठोर कारवाई करावी अशा मागणीसाठी दिनांक ६ जून पासून दिंद्रुड पोलीस ठाण्या समोर आमरण उपोषण करणार आहोत अशी माहिती भारत हजारे आशाबाई हजारे यांनी दिली.

# बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यात भारतीय सेनेकडून रोपवनास प्रारंभ



धारूर । प्रतिनिधी

भारतीय सेनेची कंपनी १३६ इको बटालियन ही तुकडी बीड जिल्ह्यात वृक्षआच्छादन व वनआच्छादन वाढविण्यासाठी कऱ्यरत आहे. २०२४-२५ ह्या वर्षी इको बटालियन मार्फत धारुर तालुक्यात किल्ले धारुर व घागरवडा येथे २२५००० वृक्षारोपण करण्यात येणार आहे. जागतिक पर्यावरण दिनाचे निमित्त साधून बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यात भारतीय सेनेच्या इको बटालियन ने किल्ले धारुर व घागरवडा येथे १०००० वृक्षारोपण करून रोपवनास प्रारंभ केला.

रोपवणाचे उद्घाटन धारुर दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती एन. एस कदम मॅडम व मानवलोक सेवाभावी संस्थचे संचालक अनिकेत लोहिया ह्यांच्या मार्फत करण्यात आले. ह्या प्रसंगी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय किल्ले धारूर चे वन परिक्षेत्र अधिकारी, वनरक्षक, वनपाल एनसीसी चे कॅसेट्स व एनएसएस चे विद्यार्थी, ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय धारुर चे विद्यार्थी व शिक्षक वृंद, माजी सैनिक, स्थानिक पोलिस अधिकारी , प्रतिष्ठित नागरिक व मीडियाचे प्रतिनिधी हजर होते.

# शालेय पाठ्यपुस्तकात मनुस्मृति श्लोक शिकवू नये

## बौद्ध महासभेचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे, यांनी तयार केलेला राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ मसुद्यावर प्रतिक्रिया नोंदविण्याबाबत केलेल्या आवाहनानुसार खालीलप्रमाणे हरकत या पत्राद्वारे नोंदविण्यात येत आहेत. इयत्ता तिसरी ते इयत्ता बारावीच्या अभ्यासक्रमामध्ये भगवद्गीता, मनाचे श्लोक आणि मनुस्मृति यांच्या विषमतावादी विचारांचा, धोरणांचा समावेश करणे या बाबी भारतीय संविधानाच्या मूलभूत अधिकार कलम १३,१४,१७,१९, २१, २८ नुसार बेकायदेशीर व असंविधानिक असल्यामुळे त्या विरोधात तीव्र निषेध व्यक्त करण्यात येत असून व हरकती नोंदविण्यात येत आहे. आपल्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार शालेय अभ्यासक्रमामध्ये मनाचे श्लोक, भगवद्गीता आणि मनुस्मृतीच्या काही अंशाचा समावेश करणे आक्षेपार्ह असून, धर्मनिरपेक्ष असलेल्या भारतातील सर्व नागरिकांस समान असलेल्या समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि नैसर्गिक न्यायाच्या संकल्पनेला काळीमा फासणारी बाब आहे.

तसेच सर्जनशील भारताची निर्मिती करणाऱ्या शिक्षण प्रणालीमध्ये अशा प्रकारच्या समता मुलक समाज निर्मितीच्या संविधानाच्या तत्त्वाला मूठमाती देणाऱ्या विषमता वादाचा पुरस्कार व त्याचे समर्थन करणाऱ्या अभ्यासक्रमाचा शालेय शिक्षणात समावेश




करून गोर-गरीब भारतीय नागरिकांमध्ये भय आणि मानवी विषमता निर्माण होण्यास खतपाणी घालण्याचा प्रयत्न स्पष्ट होत आहे. आपल्या देशाच्या धर्मनिरपेक्ष संविधानाने देशातील सर्व जाती धर्मांना संरक्षित करत, कलम २८ प्रमाणे आश्वस्त केले आहे की, कलम २८ (१) नुसार, पूर्णतः राज्याच्या निधीतून चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही अशी तरतूद आहे, त्यामुळे सरकारकडून कोणत्याही धर्माच्या विचारसरणीच्या बाबी शिकविता येणार नाहीत. त्याचबरोबर भारतीय संविधानातील कलम १३ (१) नुसार, या संविधानाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी भारताच्या राज्यक्षेत्रात अंमलात असलेले सर्व कायदे, ते जेथवर या भागाच्या तरतुदींशी विसंगत असतील तेथवर, ते अशा विसंगतीच्या व्याप्तीपुरते शून्यवत आहे, १३ (२) नुसार राज्य या भागाने प्रदान केलेले हक्क हिरावून घेणारा किंवा त्यांचा संकोच करणारा कोणताही कायदा करणार नाही आणि या खंडाचे उल्लंघन करुन केलेला कोणताही कायदा, आदेश, नियम, विनिमय, सूचना, शिक्षण, प्रशिक्षण इत्यादी शून्यवत ठरविले आहेत. असे असताना उपरोक्त बाबी शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे देशातील युवा वर्गाला अधोगतीच्या विषमतेच्या दिशेने पुन्हा घेऊन जाण्याचा प्रयत्न करत असल्याचे स्पष्ट होते आहे. वरील पार्श्वभूमीवर प्रस्तावित मसुदयामध्ये मनाचे श्लोक, भगवद्गीता आणि मनुस्मृतीच्या काही अंशाचा समावेश करणे भारतीय संविधानाच्या मूलभूत अधिकार १३,१४,१७,१९,२१,२८ नुसार बेकायदेशीर व असंविधानिक असल्यामुळे त्या बाबी रद्द कराव्यात आणि संविधानाची प्रास्ताविका, अनुछेद १३ ते ३२ पर्यंतचे मूलभूत अधिकार आणि भारतीय नागरिकांची मूलभूत कर्तव्यें या मूल्यांचा समावेश करावे की ज्यामुळे भारतीय नागरिक आपल्या हक्क आणि अधिकारासंबंधी आणि कर्तव्या संबंधी जागृत होतील. तेच देश हितकारक आहे. वरीलप्रमाणे दुरुस्ती न झाल्यास दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया / समता सैनिक दल आणि संविधान समर्थक समाज, विविध संघटनांच्यावतीने महाराष्ट्रभरामध्ये तीव्र स्वरूपाचे पडसाद उमटतील आणि उग्र आंदोलन छेडण्यात येतील त्याची संपुर्ण जबाबदारी आपली असेल, याची गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी. याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ भीमराव य. आंबेडकर (ट्रस्टी / राष्ट्रीय कार्याध्यक्ष व समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष) व डॉ. हरीष रावलिया (ट्रस्टी चेअरमन), ॲड. सुभाष जौंजाळे (रिपोर्टिंग ट्रस्टी चेअरमन) यांच्या नेतृत्वाखालील शिष्ट मंडळाबरोबर चर्चा करण्यासाठी वेळ दयावी, ही विनंती यावेळी शिष्टमंडळात भारतीय बौद्ध महासभेचे बीड जिल्हा अध्यक्ष महालिंग निकाळजे,अमरसिंह ढाका, विश्वनाथ निसर्गन, शोभा साळवी, अरुणा निसर्गन,गौतम खेमाडे,केतन गायकवाड, गौतम कांबळे,संदेश डोळस,दिपक कांबळे,मिलिंद सरपते, सिद्धेश्वर बनसोडे, सदाशिव पट्टेकर आदी उपस्थित होते.

# निकालापूर्वीच विद्यार्थ्यांना नोकरी

## 'योगेश्वरी पॉलिटेक्निकच्या ' १५ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये निवड

अंबाजोगाई, प्रतिनिधीः

येथील कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक मधील तृतीय वर्ष स्वयंचलित अभियांत्रिकी व यंत्र अभियांत्रिकीच्या १५ विद्यार्थ्यांची टाटा मोटर्स, जॉन डीअर, महिंद्रा अँड महिंद्रा या नामांकित कंपन्यांमध्ये तृतीय वर्षाचा निकाल लागण्यापूर्वीच कॅम्पस मुलाखतीत निवड झाली आहे. संस्थेमध्ये स्वतंत्र ट्रेनिंग आणि प्लेसमेंट विभाग कार्यरत असून या विभागाच्या वतीने देशातील विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांबरोबर करार करण्यात आला आहे. या अंतर्गत विविध कंपन्यांना आमंत्रित करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पदविका अभ्यासक्रम संपण्यापूर्वीच नोकरी उपलब्ध करून देण्यात येते. यापूर्वीही शेकडो विद्यार्थी या अंतर्गत विविध कंपन्यांमध्ये रुजू झाले आहेत. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये पांचाळ भास्कर, अनिकेत मगर, अश्विनी जोगदंड, प्रथमेश भांगे, सुमित घाडगे, कृष्णा भैरट, अश्वमेध शेळके, मुंडे चेतन, अवंती गवळी, कल्याणी वाघमारे, गोमसाले धनराज, सुरज वाकणकर, शेख फैझल, सोमेश दहिवाळ, ओमकार घायाळ, यांचा समावेश असल्याची माहिती ट्रेनिंग आणि प्लेसमेंटचे प्रमुख प्रा. गडदे एस. एन. यांनी दिली.विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रशेखर बर्दापूरकर, उपाध्यक्ष श्री गणपत व्यास, का. उपाध्यक्ष ॲड. जगदीश चौसाळकर, सचिव श्री कमलाकरराव चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ. शैलेश वैद्य, संचालक श्री प्रताप पवार, व प्राचार्य रमण देशपांडे यांनी अभिनंदन केले आहे.

योगेश्वरी पॉलिटेक्निक मध्ये दरवर्षी कॅम्पस मुलाखती घेतल्या जातात. यामुळे पॉलिटेक्निकची पदविका मिळण्यापूर्वीच विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीची संधी प्राप्त होत आहे. अर्थातच विद्यार्थ्यांवर बेरोजगारीची वेळ येत नाही. त्याचप्रमाणे कंपनीमध्ये नोकरी करत असतानाच स्वतःच्या पायावर उभे राहून उच्च शिक्षण घेता येते. गेल्या बारा वर्षांमध्ये तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या शेकडो विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे नोकरीची संधी मिळालेली आहे

– श्री.रमण देशपांडे
प्राचार्य

राज्य लोकतंत्र
शुक्रवार दि.७ जून २०२४


# महायुतीच्या नेत्यांमधील बेबनाव पंकजा मुंडेच्या आंगलट

## »ओबीसी पट्ट्यातील धारूर,वडवणी तालुक्याने तारले..

**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

**बीड लोकसभा मतदारसंघातील माजलगाव विधानसभा तालुक्यात ही लोकसभेची निवडणूक महायुतीच्या मातब्बर नेत्यांविरुद्ध महाविकास आघाडीच्या सर्वसामान्यांची निवडणूक ठरली. भाजपच्या बालेकिल्ल्यात महाविकास आघाडीच्या उमेदवाराला जवळपास सर्वच फेऱ्यांमध्ये आघाडी मिळाली.आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी येथील अनेक नेते भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढण्यास इच्छुक होते,परंतु या निकालामुळे त्यांना आता कोणत्या पक्षात जावे याचा विचार करावा लागणार आहे.**

महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे व महाविकास आघाडीचे बजरंग सोनवणे यांच्यातील निवडणूक सुरुवातीला एकतर्फी वाटली होती.पंकजा मुंडे यांच्या बाजूने माजलगाव तालुक्यातील राष्ट्रवादीचे आमदार प्रकाश सोळंके, भाजपा नेते रमेशराव आडसकर, बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे,भाजपा विधानसभा प्रमुख मोहनराव जगताप,मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक,माजी सभापती नितीन नाईकनवरे, सभापती जयदत्त नरवडे,हे मातब्बर नेते होते.तर महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या बाजूनेमाजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत शेजुळ,माजी नगराध्यक्ष साहाल चाऊस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस दयानंद स्वामी,राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे विधानसभा अध्यक्ष नारायण डक,राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाचे तालुकाध्यक्ष मनोहर डाके, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते कचरु खळगे, विश्वंभर थावरे व सर्वसामान्य तरूण दिसून आले. माजलगावात पंकजा मुंडेंसाठी नितीन गडकरी यांनी

पान ३ वर



### माजलगाव शहरातुन बंजरंग सोनवणेंना ३७७३ मतांची आघाडी

लोकसभा निवडणुकीच्या मतदाना दरम्यान माजलगाव शहारातील ३८ मतदान केंद्रावर महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना ९००७ मतदान झाले,तर महाविकास आघाडीचे बंजरंग सोनवणें यांना १२,७७८ मतदान झाले असुन माजलगाव शहरातुन महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना ३७७३ मतांची आघाडी माजलगाव शहरातील मतदारांनी दिली.

### माजलगाव तालुक्यांतून बजरंग सोनवणेंना ९६७३ मतांची आघाडी

माजलगाव विधानसभा मतदारसंघातील माजलगाव तालुक्यात महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना ३९,३३२ मतदान झाले,तर महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणेंना ५२,७७४ मतदान झाले,त्यामुळे माजलगाव तालुक्यातुन महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणेंना ९,६७२ मतांची आघाडी तालुक्यातील मतदारांनी दिली.




बीड : माजलगाव तालुक्यातील खाडेवाडी येथील ओमकार लक्ष्मण कांदे यास पहिल्या प्रयत्नात निटमध्ये ६५७ गुण मिळाल्याबद्दल दै.लोकतंत्रच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यकारी संपादक अशोक खाडे, उपसंपादक अनिल जाधव, सचिन नागरगोजे, नागेश क्षीरसागर आदी उपस्थित होते.

## पराभूत उमेदवाराबद्दल आक्षेपाहार्य पोस्ट परळीत मध्यरात्री गुन्हा दाखल

**परळी । प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणूक निकाल कारणावरून दोन जातीत,गटात वितुस्ट निर्माण होईल अशी समाज माध्यमावर पोस्ट करणाऱ्या युवकाविरोधात परळी शहर पोलीस ठाण्यात एक युवकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार परळी शहरातील गणेशपार भागात रहिवासी असलेल्या गणेश हरिभाऊ सावंत या युवकाने लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर स्वतःच्या फेसबुक पेज वरुन पराभूत उमेदवार यांना उद्देशून अपेहार्य पोस्ट लिहून त्याखाली काही लोक नाचत असलेला व्हीडीओ टाकुन दोन जातीमध्ये किंवा दोन गटात द्वोषाची भावना निर्माण हाईल व त्यामुळे सार्वजणीक प्रशांतता बिघडेल याची कल्पना असताना जानिवपुर्वक फेसबुक पोस्ट टाकली. समाज माध्यमावर बीड पोलिसांची करडी नजर असून पोस्ट केलेल्या या प्रकरणात शहर पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार विष्णू फड यांच्या फिर्यादीवरून गुरनं. ८३/२०२४ कलम १५३ (अ), ५०५ (२) भादवी सह कलम ६७ माहिती तंत्रज्ञान कायद्यानव्ये गणेश सावंत यांच्या विरोधात बुधवार दि ५ रोजी मध्यरात्री दरम्यान गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी अधिक तपास पोलीस निरीक्षक लोहकरे हे करत आहेत.

## पनामा कंपनीची पवनचक्की कोसळून मोठे नुकसान

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई शहरापासून जवळ असलेल्या पालक या डोंगरावरील पनामा कंपनीची एक पवन चक्की कोसळून मोठे नुकसान झाले आहे तरी या अपघातात कोणती जीवित हानी झालेली नसून पणामा कंपनीचे मोठे नुकसान झाले आहे.**

गेवराई शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या पालख्या डोंगराजवळील खोपटी तांडा येथे पनामा कंपनीची पवन चक्की होती. या पवन चक्कीचा एक पंखा तुटून पाडला त्यानंतर पवन



चक्कीचं संतुलन बिगडले व संपूर्ण पवनचक्कीच खाली कोसळली ही घटना दि. ६ गुरुवार रोजी सकाळी नऊ ते दहा च्या दरम्यान घडली असल्याचे समजते. या घटनेमध्ये पनामा कंपनीचे मोठे नुकसान झाले आहे तसेच ही पवनचक्की ज्या जागेवर होती त्या जागेवर आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर जनावरे चरण्यासाठी जात असतात व नागरिक ही शेती करत आहेत परंतु ज्या

पान ३ वर

## हेल्मेट सक्तीच्या नावाखाली होणारी लूट थांबवा–गोरख काळे

**बीड । प्रतिनिधी**



धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर मांजरसुंबा परिसरात हेल्मेट सक्तीच्या नावाखाली पोलिसांकडून होणारी दुचाकी स्वरांची आर्थिक लूट त्वरित थांबवा अशी मागणी मांग गारूडी समाजाचे जिल्हाध्यक्ष गोरख काळे यांनी केली. पोलीस प्रशासन कोणत्या ना कोणत्या माध्यमातून सामान्य नागरिकांची लूट करण्याचा वारंवार प्रयत्न करत आहे. वाहतूक शाखा असेल किंवा महामार्ग पोलीस असतील हे अनेक वेळा सामान्य नागरिकांच्या खिशावर दरोडा टाकण्याचे काम करीत असतात. हाच प्रकार धुळे – सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर मांजरसुंबा परिसरात घडत आहे. वाहतूक पोलीस कोणत्या ना कोणत्या माध्यमातून प्रवाशांना लुटण्याचे काम करत आहे. केवळ हेल्मेट सक्तीच्या नावाखाली ग्रामीण भागातील गोरगरीब दुचाकी चोरांना दंड आकारण्यात आहेत.

पान ३ वर

## शंकी गोगलगाय नियंत्रणासाठी उपायोजना

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात मागील तीन वर्षापासून सोयाबीन कापूस भाजीपाला आदी पिकांवर शंकी गोगलगायीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. सोयाबीन पिकांमध्ये रोप अवस्थेतच गोगलगायींचा प्रादुर्भाव होत असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते. या गोगलगायींना वेळीच ओळखून खालील प्रमाणे उपाययोजना करणे गरजेचे आहे जेणेकरून पुढील नुकसान टाळता येईल.**

शंखी गोगलगाय किडीची ओळख:- शंकीच्या पाठीवर एक ते दीड इंच लांबीचे गोलाकार कवच असते. बहुतांशी शंकी गर्द, करड्या, फिकट किंवा हिरव्या काळपट रंगाच्या असतात. ही कीड



रात्रीच्या वेळेस आक्रमक होऊन पाने खाऊन छिद्र पाडते तसेच नवीन रोपे, कोबं, भाजीपालावर्गी पिके, फळे, फुले तसेच इतर सर्व प्रकारच्या पिकांचे अवशेष यावरी उपजिका करते. प्रतिबंधात्मक उपायोजना:- शेतकऱ्यांनी ८० ते १०० मी.मी. पाऊस पडल्यानंतरच पेरणी करावी. जमिनीचे खोल नांगरट करावी, बांधाच्या कडेला चर खोदावे, शेताचे बांध स्वच्छ ठेवावेत जेणेकरून गोगलगायना लपण्यास व अंडी घालण्यापासून रोखता येते. रबरी हात मोजे घालून प्रादुर्भावीत शेतातील शंकी गोगलगायी व त्यांची लपण्यास व अंडी घालण्यापासून रोगखता येते. रबरी हातमोजे घालून प्रादुर्भावीत शेतातील शंखी गोगलगायी व त्यांची अंडी गोळा करून नष्ट करावीत. गुळाच्या द्रवणात एक किलो गुळ प्रति दहा लिटर पाणी गोणपाटाचे पोती भिजवून ती संध्याकाळच्या वेळेस शेतात पिकाच्या ओळीत पसरून द्यावीत. त्याखाली लपलेल्या गोगलगायी सकाळी गोळा करून उकळत्या पाण्यात किंवा साबणाच्या द्रावणात किंवा केरोसीन मिश्रित पाण्यात

पान ३ वर

## असे करा पिकाचे नियोजन

बीड । प्रतिनिधी

सध्या जिल्ह्यात सर्व दूर पेरणीला लायक पाऊस झालेला नाही. त्यामुळे शेतकरी वर्गाने पेरणीची घाई करू नये. साधारणतः ७५ ते १०० मिलिमीटर पाऊस झाल व जमिनीत साधारणतः सहा इंच ओल झाली त्यानंतर पेरणी करावी.पेरणी करण्यापूर्वी घरच्या घरी बियाण्याची उगवण क्षमता तपासून घ्यावी. रासायनिक खतांचा अति वापरा अयोग्य वापर जमिनीच्या आरोग्यासाठी चांगला नसतो. तेव्हा रासायनिक खते वापर करण्यापूर्वी जमिनीत पुरेशा प्रमाणात सेंद्रिय खतांचा वापर करावा. रासायनिक खतांचा बेसल डोस ठरविताना माती परीक्षण अहवाल अथवा गावचा जमीन सुपिकता निर्देशांक याचा वापर करून तो डोस पेरणी वेळी द्यावा. रासायनिक खतांची बचत होण्यासाठी बियाणास जैविक खतांची वीज प्रक्रिया करावी. आपल्या गावचे कृषी सहाय्यक यांना संपर्क करून आपण बियाणे उगवण बीज प्रक्रिया आदींचे प्रत्याक्षिक देखील करू शकता, असे आवाहन जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी यांनी केले आहे.

## खते, बियाणे,औषधी संबंधित काही अडचणी आल्यास संपर्क साधण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

**सध्या खरीप २०२४ हंगाम सुरू झालेला आहे. या हंगामात शेतकरी मोठ्या प्रमाणात बियाणे खते व नंतर औषधे खरेदी करत असतात त्यांना उत्तम दर्जाचे खते बियाणे व औषध उपलब्ध व्हावे, योग्यरीत्या किमतीत उपलब्ध व्हावे या उद्देशाने राज्यात गुणवत्ता नियंत्रण विभाग कार्यरत आहे. या विभागाची कार्य कक्षा तालुकास्तरावर पंचायत समितीचे कृषी अधिकारी तथा निरीक्षक व तालुका कृषी अधिकारी तथा निरीक्षक यांच्यापर्यंत आहे.**

खरीप हंगामात या दोन्ही कार्यालयात तसेच जिल्हास्तरावर जिल्हा परिषद व जिल्हाध्यक्ष कृषी अधिकारी कार्यालय येथे नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. यांची वेळ सकाळी ९.३० ते सायंकाळी ७.३० पर्यंत अशी आहे. याशिवाय तालुका स्तरावर तालुका कृषी अधिकारी व कृषी अधिकारी पंचायत समिती यांची भरारी पथके कार्यरत आहे. जिल्हास्तरावर कृषी विकास अधिकारी व जिल्हा गुणवत्ता निरिक्षक यांचे भरारी पथक कार्यरत आहे. याशिवाय राज्यस्तरावरील कक्षाचे व टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत तसेच कृषी उपसंचालक, उपविभागाची कृषी अधिकारी व उपविभागीय कृषी अधिकारी यांचे तंत्र अधिकारी यांनाही निरीक्षकाचा दर्जा बहाल करण्यात आलेला आहे. खते बियाणे व औषधी संबंधित काही अडचणी असल्यास शेतकरी त्यांच्या स्थानिक कार्यक्षेत्रातील तालुका अथवा पंचायत समिती कक्षाकडे अथवा भरारी पथकाकडे करू शकतात या विविध स्तरावरील पक्षांचे तसेच भरारी पथकांचे दूरध्वनी क्रमांक शेतकरी वर्गासाठी खुले करण्यात आलेले आहेत. त्यांची यादी सोबत जोडली आहे. विशिष्ट कंपनी अथवा ग्रेड अथवा वाणाचा कोणीही आग्रही ठेवू नये. बाजारात बियाण्यांची असंख्य प्रकार उपलब्ध आहेत त्यानुसार पर्याय ठेवावा. विशिष्ट ग्रेडचे खत उपलब्ध नसल्यास कृषी सहाय्यक यांचे मार्गदर्शन घेऊन शेतकरीस्तरावर विविध खते

पान ३ वर

## धारूर तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्राची इमारत धूळखात

### प्रशासनाचे दुर्लक्ष: पद रिक्त असल्याने खेळाडू प्रशिक्षणापासून वंचित

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

**राज्यस्तरावर अनेक गुणवान खेळाडू देणाऱ्या तालुक्यातील प्रशिक्षण केंद्र व मैदानाची दुरावस्था झाली आहे मागील काही वर्षा पूर्वी तालुक्यातील खेळाडूंना उच्च दर्जाचे प्रशिक्षण मिळावे व चांगल्या दर्जाचे खेळाडू तयार व्हावेत या उद्देशाने शहरात सुसज्ज प्रशिक्षण केंद्र व अद्यावत मैदान उभारण्याचे काम चालू होते परंतु वेळेत काम पूर्ण न झाल्याने खेळाडूंना प्रशिक्षण केंद्राचा व मैदानाचा वापर करता येत नाही त्यामुळे खेळाडू मधून प्रशासनाविरुद्ध रोष व्यक्त केला जातोय.**





धारूर शहरांमध्ये शासकीय क्रीडा प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येत आहे मागील अनेक दिवसापासून प्रशिक्षण केंद्राची इमारत बांधकाम पूर्ण होऊनही वापरा अभावी धुळखात पडून आहे हे प्रशिक्षण केंद्र सुरळीत सुरू नसल्यामुळे तालुक्यातील क्रीडा प्रेमी व खेळाडू यांच्याकडून रोश व्यक्त केला जात आहे.धारूर शहरांमध्ये एक हेक्टर साठ आर जागेवर महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक संचनालय यांच्या माध्यमातून शासकीय प्रशिक्षण केंद्र उभारण्याचे काम मागील अनेक वर्षापासून सुरू आहे यामध्ये तालुका प्रशिक्षण केंद्राची इमारत उभारण्यात आली व खेळाडूंसाठी मैदानही राखीव करण्यात आले प्रशिक्षण केंद्राची इमारत बांधून तयार झाली आहे परंतु प्रशासनाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्षामुळे इमारत वापरा अभावी बंद आहे खेळाडूंसाठी तयार करण्यात आलेल्या मैदानावर काटेरी झाडे

पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# अजित पवारांचा पुतण्या युगेंद्रला झटका

## बारामती कुस्तीगीर संघावरून हटविण्याच्या हालचाली

बारामती : बारामती लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांच्या प्रचाराची धुरा सांभाळणाऱ्या युगेंद्र पवार यांच्याकडून बारामतीत कुस्तीगीर संघाचे अध्यक्षपद काढून घेण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या पराभवानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून युगेंद्र यांना हटवण्यात येणार असल्याची चर्चा बारामतीत आहे. युगेंद्र यांनी मात्र याबाबत माझ्याकडे अधिकृतपणे काहीही आलेले नाही, असे सांगितले.



बारामती शहर व तालुक्यात युगेंद्र यांनी सुप्रिया सुळे यांच्या प्रचाराची मोठी जबाबदारी सांभाळली. शिवाय बारामतीचा विकास हा शरद पवार यांच्यामुळे झाल्याचे त्यांनी सांगितले होते. येथील महत्त्वाच्या संस्था शरद पवार यांनीच उभ्या केल्या असल्याचेही ते म्हणाले होते. त्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचा जन्मही नव्हता, तेव्हापासून मी राजकारणात असल्याचा पलटवार केला होता. शिवाय काहींना आत्तापासूनच आमदारकीची स्वप्ने पडू लागली आहेत, असा टोला युगेंद्र यांचे नाव न घेता लगावला होता.

आता निवडणूकीनंतर युगेंद्र यांना बारामती तालुका कुस्तीगीर संघाच्या अध्यक्षपदावरून हटविले जावू शकते. युगेंद्र याबाबत म्हणाले, मला हटविण्यासाठी परवा एका ठिकाणी बैठक झाल्याचे माझ्या कानावर आले आहे. पण निवडणूक झाल्यानंतरच ही चर्चा सुरू झाली आहे. असा प्रश्न केला असता युगेंद्र पवार म्हणाले की, ही केवळ चर्चा आहे. कोणी कशावरही चर्चा करेल. मात्र प्रत्येक चर्चा खरीच असते असे नाही. गेली तीन ते चार वर्षांपासून कुस्तीगीर संघाची जबाबदारी माझ्याकडे आहे. या काळात आपण खूप कामे केली आहेत. अजित दादांनी पण खूप मदत केली आह

लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळे यांच्या बाजूने काम केल्याची ही पोच पावती आहे काय..? असे विचारले असता ते म्हणाले की, अद्याप याबाबत माझ्याकडे अधिकृत काहीही आले नाही. मात्र तुम्ही याबाबत जो अर्थ लावायचा असेल तो लावू शकता. यासंदर्भात जर काही पत्र व्यवहार झाला तर ज्येष्ठ नेते शरद पवार यांची मी भेट घेईल असे ते म्हणाले.

सुप्रिया सुळे यांच्या विजयाबाबत बोलताना ते म्हणाले की, जे आम्हाला अपेक्षित होते ते झाले आहे. सर्व कार्यकर्त्यांच्या कष्टाला फळ मिळाले. सुप्रिया सुळे विजयी झाल्या याचा आम्हाला आनंद आहे.

## सलग दुसऱ्या दिवशीही पाऊस; ११ जूनपर्यंत राहणार अवकाळीचा जोर



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहर आणि परिसरात सलग दुसऱ्या दिवशी मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली. विशेषत: वडगाव शेरी, एनडीए, खडकी, लोहगाव, चिंचवडसह आसपासच्या परिसरात पावसाचा जोर चांगलाच होता. दरम्यान, या पावसामुळे पुन्हा एकदा रस्त्यावरून जोरदार पाणी वाहिले तर काही भागात पाणी साठले. मान्सूनपूर्व पाऊस ११ जूनपर्यंत कोसळेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

पुणे शहर आणि परिसरात सोमवारपासून मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. या पावसामुळे शहरातील बहुतांश भागातील रस्ते पाण्याखाली गेले होते. त्यामुळे अनेक वाहने पाण्यातच बंद पडली. मंगळवारीदेखील सकाळपासूनच शहर परिसरात उन्हाचा तडाखा चांगलाच जणवत होता. दुपारनंतर पुन्हा वडगाव शेरी, लोहगाव, पाषाण, एनडीए, कात्रज, लवळे, तळेगाव ढमढेरे, नारायणगाव आदी भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे काही भागात झाडपडीच्या घटना घडल्या. ११ जूनपर्यंत शहरात अवकाळी पाऊस हजेरी लावणार आहे, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

## सैनिकी मुला-मुलींच्या वसतिगृहामध्ये भरतीसाठी २० जूनपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

सैनिकी मुलांच्या-मुलींच्या वसतिगृहाकरिता अशासकीय कर्मचाऱ्यांची निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असून इच्छुक माजी सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा पत्नी व इतर नागरिकांनी २० जूनपर्यंत संबंधित वसतिगृहात अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पर्वती येथील सैनिकी मुलांच्या वसतिगृहामध्ये सहायक वसतिगृह अधीक्षक ३ (पुरूष) मानधन २४ हजार ४७७ रुपये, स्वयंपाकी ८ (महिला) मानधन १३ हजार ९२४ रुपये, सफाई कर्मचारी ३ (महिला/पुरूष) मानधन १३ हजार ८९ रुपये, माळी १ (पुरूष) मानधन १३ हजार ८९ रुपये, पहारेकरी १ (पुरूष) मानधन २० हजार ८८६ रूपये तसेच नवी पेठ येथील सैनिकी मुलींच्या वसतिगृहामध्ये सहायक वसतिगृह अधीक्षिका ३ (महिला), मानधन २४ हजार ४७७ रुपये, स्वयंपाकी ७ (महिला) मानधन १३ हजार ९२४ रुपये, सफाई कर्मचारी २ (महिला) मानधन १३ हजार ८९ रुपये, माळी १ (महिला/पुरूष) मानधन १३ हजार ८९ रुपये व पहारेकरी १ (पुरूष) मानधन २० हजार ८८६ रूपये अशी पदे भरण्यात येणार आहेत.

अधिक माहितीसाठी वसतिगृह अधीक्षक शेख अब्दुल (भ्र.ध्व. क्र. ७०२०४१०९५४) आणि वसतिगृह अधीक्षिका श्रीमती मंगला कांबळे (भ्र.ध्व. क्र. ९५१८३७४८६३) या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी लेफ्टनंट कर्नल एस.डी. हंगे (नि.) यांनी कळविले आहे.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पिंपरी चिंचवड विद्यापीठात ग्रीन इनोव्हेटिव्ह क्लबचे उद्घाटन

पिंपरी, पुणे । प्रतिनिधी

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पिंपरी चिंचवड विद्यापीठात (पीसीयु) ग्रीन इनोव्हेटिव्ह क्लबचे उद्घाटन करण्यात आले. या क्लबचा उद्देश महाविद्यालय परिसरात आणि समाजात पर्यावरण संवर्धन, संरक्षण आणि जागरूकता यांना या उपक्रमात प्रोत्साहन दिले जाईल अशी माहिती पीसीसीओईचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी या उपक्रमाचे उद्घाटन प्रसंगी दिली. यावेळी पीसीयुच्या प्रभारी कुलगुरू डॉ. मणीमाला पुरी, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, पीसीईटी संचलित सर्व शाळांचे प्रमुख, प्राध्यापक सदस्य, कर्मचारी,




विद्यार्थी उपस्थित होते.

वाढत्या प्रदूषणामुळे नैसर्गिक साधनसंपत्ती रक्षणासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे. त्यादृष्टीने पीसीयुने ग्रीन इनोव्हेटिव्ह क्लबच्या स्थापनेतील पुढाकाराचे कौतुक केले. पर्यावरणीय शाश्वतता आणि जबाबदारीला प्रोत्साहन देण्यासाठी हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. शिकण्याचे आणि नवकल्पनेचे केंद्र म्हणून, विद्यापीठांनी पर्यावरणास अनुकूल असलेल्या अभ्यासांना प्रोत्साहन देऊन नवा आदर्श निर्माण करण्याची अनोखी संधी आहे, असे डॉ. मणीमाला पुरी यांनी सांगितले.

पर्यावरणीय मुद्द्यांवरील कार्यशाळा आणि चर्चासत्रांचे आयोजन करणे, शाश्वतता अभ्यासांवरील जागरूकता मोहीम राबविणे, विद्यापीठ परिसरात हरित प्रकल्प जसे वृक्षारोपण अभियान, कचरा कमी करण्याच्या उपक्रम, ऊर्जा बचत कार्यक्रम सुरू करणे, विद्यार्थ्यांना पर्यावरणीय आव्हानांसाठी नवकल्पना उपाय विकसित करण्यास प्रोत्साहित करणे हे ग्रीन इनोव्हेटिव्ह क्लबचे मुख्य उद्देश आहेत असे डॉ. सुदीप थेपडे यांनी सांगितले. ग्रीन इनोव्हेटिव्ह क्लबच्या प्रभारी डॉ. अंजू बाला यांनी क्लबचे लोगोचे अनावरण केले. त्यांनी आगामी उपक्रमांबाबत संक्षिप्त सादरीकरण केले. सदस्य सचिव डॉ. नीरू मलिक आणि क्लबचे सदस्य विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

## 'शिवराज्याषिभेक दिन राष्ट्रीय शिवस्वराज्य दिन म्हणून जाहीर..'

**पुणे । प्रतिनिधी**

शिवस्वराज्य दिन चिरायू होवोशिवराज्याभिषेक दिन चिरायू होवो, जय भवानी जय शिवाजी, छत्रपती शिवाजी महाराज की जय, असा गगनभेदी जयघोष झाला. रणशिंगाच्या ललकारीत, मर्दानी खेळाच्या चित्त थरारात आणि ढोल-ताशांच्या गजरात एसएसपीएमएस संस्थेच्या प्रांगणातील परिसर हजारो शिवभक्तांनी दणाणून गेला. शिवजयंती महोत्सव समितीतर्फे ५१ फूट शिवशक राजदंड स्वराज्यगुढी उभारण्यात आली.



५१ फूट शिवशक राजदंड स्वराज्य गुढी

शिवजयंती महोत्सव समिती आयोजित ३५१ व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त भगव्या स्वराज्य ध्वजासह ५१ फूट शिवशक राजदंड स्वराज्य गुढी शिवाजीनगरमधील एसएसपीएमएस येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर उभारण्यात आली. सोहळ्याचे हे सलग १२ वे वर्षे होते.

कार्यक्रमात शिवकालीन सरदारांचे वंशज, सार्वजनिक शिवस्वराज्य दिनाचे प्रवर्तक समितीचे संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड, समितीचे सचिव सचिन पायगुडे, उपाध्यक्ष रवींद्र कंक, सदस्य शंकर कडू, निलेश जेधे, मंगेश, सागर पवार, प्रवीण गायकवाड, किरण शितोळे, मोहन पासलकर, मयुरेश दळवी आणि सर्व स्वराज्य घराणे, स्वराज्य बांधव, महिला वर्ग उपस्थित होते. यावेळी रिंकल गायकवाड, ललिता कंक, अश्विनी कडू, प्रिया जेधे, प्रिया पासलकर, शोभा भोई, दिपाली गव्हाणे, महिलांच्या हस्ते भगव्या स्वराज्य ध्वजासह शिवशक राजदंड स्वराज्यगुढीचे विधीवत पूजन करुन ५१ फूट स्वराज्यगुढी उभारण्यात आली.

शिवराज्याभिषेक शिल्पाचे पूजन

सोहळ्याची सुरुवात शिवरायांच्या शिवराज्याभिषेक शिल्पाचे पूजन करुन झाली. त्यानंतर शिवरायांच्या स्मारकाला पुष्पहार अर्पण करण्यात आला. समितीने खास बनवलेल्या ३५१ सुवर्णहोनांनी शिवरायांना अभिषेक करण्यात आला.

## वडगाव मावळ येथे दोन गटात मारामारी; एकाचा जागीच मृत्यू

**मावळ । प्रतिनिधी**

वडगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत आधी झालेल्या भांडणाचा राग मनात घेऊन धारदार शस्त्राने वार करत एकाचा खून करण्यात आला आहे. ही घटना अंदर मावळ भागातील कुसुरगाव हद्दीत बुधवार (दि.५ जुन) रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास घडली आहे.

सदर बाबतची तक्रार भाग्यश्री अनिल कांबळे वय १९ राहणार शिरूर जी पुणे सध्या राहणार खराडी बायपास खांदवे नगर पुणे यांनी वडगाव पोलिस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी १० लोकं विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार कुसुर गावाच्या हद्दीत टाकवे ते खांडी या रस्त्यावर सुरुवातीला अक्षय जगताप यांनी अंकुश टुडे यास याची रात्री साडेआठच्या सुमारास भांडण झाल्यामुळे नाकावर बुक्की मारून त्याला जखमी केले त्या कारणावरून अशोक तुरडे मोहन तुरडे, सुभाष तुरडे यांनी पाच-सहा अनोळखी इसमान सोबत मिळून लोखंडी कोयता व लोखंडी रॉड तसेच लोखंडी दांडक्याने अक्षय जगताप याला डोक्यात पाठीवर व हातापायावर वार करून गंभीर जखमी केले त्यातच २६ वर्षीय अक्षय याचा मृत्यू झाला. घटना घडल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

घटनेची माहिती मिळताच वडगाव पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कुमार कदम इतर अधिकाऱ्यांना सह घटनास्थळी दाखल झाले. अक्षय जगताप याचा मृतदेह शविच्छेदनासाठी तळेगाव येथील रुग्णालयात पाठवण्यात आले असून या घटनेनंतर संपूर्ण परिसरात तणावाचे वातावरण पसरले आहे. आरोपीचा शोध सुरू असून पुढील तपास वडगाव पोलीस करीत आहे.

## चार चाकी टेम्पो चोरणारा चोरटा ताब्यात

**पुणे । प्रतिनिधी**

भारतीय विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकातील अधिकारी व आमदार यांनी चार चाकी टेम्पो चोरणारा चोरट्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून दहा लाख रुपये किमतीचा टेम्पो हस्तगत केला आहे. ही कारवाई दिनांक पाच जून रोजी करण्यात आली आहे.

संदीप संजय कालवणे, वय ३४ रा. आंबेगाव बु., मूळ रा. चाकुर तालुका जिल्हा लातूर असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार भारतीय विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकातील अधिकारी व अमलदार हे पोलीस स्टेशनच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पोलीस आमदार मितेश चोरमोले, अभिनय चौधरी व अवधूत जमदाडे यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की गायमुख चौक आंबेगाव बु. या ठिकाणी एक व्यक्ती भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गु.र.न. ४५१/२०२४ भा.दं.वी. कलम ३७९ या गुनातील अशोक लेलँड कंपनीचा टेम्पो घेऊन थांबला आहे. सदर बातमीच्या अनुषंगाने नमूद केलेल्या ठिकाणी तपास पथकातील कर्मचाऱ्यांनी जाऊन संदीप संजय कालवणे, वय ३४ रा. आंबेगाव बु., मूळ रा. चाकुर तालुका जिल्हा लातूर याला शीताफिनेत ताब्यात घेत त्याच्याकडील अशोक लेलँड कंपनीचा चार चाकी टेम्पो क्र. एम.एछ. १४ व्ही.एफ. १००४ हा दस लाख रुपये किमतीचा टेम्पो जप्त केला आहे.

सदरची कामगिरी पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पोलीस सह आयुक्त प्रवीण पवार, अपर पोलीस आयुक्त प्रवीण कुमार पाटील, पोलीस उपायुक्त परिमंडळ २ (पश्चिम प्रादेशिक विभाग) समार्तना पाटील, सहा पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग नंदिनी वग्यानी यांच्या मार्गदर्शनाखाली भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डी. एस. पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शरद झिने, तपास पथकाचे अधिकारी सहा. पो.नी. समीर कदम, पो.उप.नी. धीरज गुप्ता, पोलीस अमलदार अवधूत जमदाडे, मितेश चोमोले, अभिनय चौधरी, सचिन सरपाले, नामदेव रेणुसे, शैलेश साठे, चेतन गोरे, महेश बारवकर, निलेश जमदाडे, निलेश ढमढेरे, हनुमंत मासाळ, हर्षल शिंदे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, विक्रम सावंत, राहुल तांबे यांच्या पथकाने केली आहे.

# डासांची उत्पत्ती रोखुया, हिवतापाचे निर्मुलन करूया

दरवर्षी जून महिना हा 'हिवताप प्रतिबंध महिना' म्हणून पाळला जातो. किटकजन्य आजारांमुळे दरवर्षी अनेकांना जीव गमवावा लागतो. हिवताप, डेंग्यू, चिकनगुन्या, हत्तीरोगसारखे आजार डास चावल्यामुळे होतात. असे जीवघेणे आजारांपासून दूर राहण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसरात, घरात डासांची निर्मिती होवू नये म्हणून विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

किटकजन्य आजारांचा प्रसार करणाऱ्या डासांची उत्पत्ती साचलेल्या पाण्यात होत असते. डास हा साचलेल्या पाण्यात अंडी घालतो. ८ ते १० दिवसात नवीन डास जन्माला येतो. हा डास आजारी व्यक्तीला (रुग्णास) चावल्यास रुग्णाच्या शरीरातील जंतू डासाच्या शरीरात जातात. तेथे त्यांची वाढ होते व त्यानंतर हा असा दूषित डास ज्या निरोगी व्यक्तींना चावेल त्यांना डेंग्यू, चिकनगुन्या व हत्तीरोग यासारखे आजार होतात.

हिवतापाची लक्षणे:

थंडी वाजून ताप येणे हे हिवतापाचे लक्षण आहे. ताप हा सततचा असू शकतो किंवा एक दिवसाआड येऊ शकतो. नंतर घाम येवून अंग गार पडते. ताप आल्यानंतर डोके दुखते व बऱ्याच वेळा उलट्याही होतात.

डास आणि त्यांच्या उत्पत्तींची ठिकाणे:

ॲनॉफिलीस डास हा हिवतापाचा प्रसार करतो. त्याची उत्पत्ती नदी, नाले, विहिरी व तळी याठिकाणच्या स्वच्छ पाणीसाठ्यांमध्ये होते. एडिस एजिप्ती हा डास डेंग्यू आणि चिकनगुन्या या आजारांचा प्रसार करतो. त्याची उत्पत्ती ही घरगुती पाण्याच्या टाक्या, बॅरल, रांजण, हौद, फुटके डबे, निरूपयोगी साठविलेले पाणी, घरातील कुलर, फ्रिजच्या डीप ट्रे मधील पाणी, मनी प्लॅन्ट मधील पाणी इत्यादी स्वच्छ पाण्यासाठ्यामध्ये होते. क्यूलेक्स डास हा हत्तीरोगाचा प्रसार करतो. त्याची उत्पत्ती शौचालयाचा सेप्टिक टँक, तुंबलेली गटारे व पाण्याची डबके या अस्वच्छ पाणीसाठ्यात होते.



अशी घ्यावी दक्षता:

ताप आल्यास त्वरीत डॉक्टरकडे जावे. डॉक्टरच्या सल्ल्याप्रमाणे आवश्यक चाचण्या कराव्यात. शासकीय रुग्णालयात यासाठी मोफत औषधोपचार उपलब्ध आहेत. झोपताना मच्छरदाणीचा वापर करावा. पूर्ण अंग झाकले जाईल असे कपडे वापरावेत. डासांपासून संरक्षणासाठी घराच्या दारे, खिडक्यांना जाळ्या बसवाव्यात. क्रीम, मॅट, कॉईलचा वापर करावा.

डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी करा उपाययोजना:

घराच्या शौचालयाच्या सेप्टीक टँकच्या व्हेन्ट पाईपला (गॅस पाईप) जाळी बसवावी अथवा कापड बांधावे यामुळे डासांची उत्पत्ती रोखली जाते. घर आणि परिसरात स्वच्छता ठेवावी. सेप्टीक टँकचे ढापे सिलबंध ठेवावेत. गच्चीवरील पाण्याच्या टाक्यांना घट्ट झाकण बसवावीत. घरातील पाण्याच्या टाक्या, रांजण, बॅरल, हौद हे आठवड्यातून किमान एकदा घासून पुसून स्वच्छ करावेत व ते घट्ट झाकनाने आणि कापडाने नेहमी झाकून ठेवावेत. घरातील, गच्चीवरील, घराच्या परिसरातील भंगार सामान, फुटके डबे, वस्तू, निरूपयोगी टायर यांची विल्हेवाट लावावी. या ठिकाणी पावसाचे पाणी साठून डासांची उत्पत्ती होते. घरातील कुलर, मनी प्लॉट, चायनीज प्लॉटमधील पाणी आठवड्यातून किमान एकदा बदलून स्वच्छ करून पुन्हा भरावे. फ्रीजच्या ट्रेमधील पाणी वेळोवेळी काढून टाकावे. गच्चीवर अंगणात घराच्या परिसरात कोठेही पाणी साचणार नाही, याची दक्षता घ्यावी. अपर्णा पाटील, जिल्हा हिवताप अधिकारी, पुणे- सन २०२७ पर्यंत हिवताप निर्मुलन व शून्य हिवताप रुग्ण हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हिवताप निर्मूलन कार्यक्रम नागरिकांच्या सहभागाने राबविण्यात येणार आहे. हिवताप प्रतिबंध महिना राबवित असताना नागरिकांना हिवताप प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे महत्व पटवून देण्यात येणार आहे. 'डासांची उत्पत्ती रोखूया, हिवतापाचे निर्मूलन करूया' हे ब्रीदवाक्य प्रत्यक्षात आणण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी या अभियानात सक्रीय सहभाग नोंदवावा.